RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

१ सोमवार फेब्रुवारी २०२६

✽ वर्ष ५ ✽ अंक २५५

✽ पृष्ठ : ६ ✽ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी?
मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर 3 दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

## ८ पोलिस कर्मचारी निलंबित

**विदर्भ केसरी। मुंबई,**

मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती यांनी पोलिस कर्मचाऱ्यांच्या गैरजबाबदारीमुळे ८ पोलिस कर्मचार्यांना निलंबित केले आहे. तसेच दोन पोलिस कर्मचार्यांना सेवेतून बरखास्त करण्यात आले आहे. पोलिस विभागाच्या कामकाजावर शंका निर्माण होईल अशी गैरवर्तनाची कारवाई करणारे हे निर्णय घेण्यात आले आहेत. मुंबई पोलिसांच्या कामकाजामध्ये शिस्त आणि दक्षता सुनिश्चित करण्यासाठी आयुक्त देवेन भारती यांनी एक मोठा पाऊल उचलला आहे. मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या तपासानंतर काही पोलिस कर्मचार्यांवर गंभीर आरोप सिद्ध झाले होते, ज्यामुळे मुंबई पोलिस दलाच्या शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. या निर्णयामुळे पोलिस दलात अनुशासन राखण्याच्या आयुक्तांच्या कडक भूमिकेचा पुनः आढावा घेण्यात आला आहे. निलंबित करण्यात आलेल्या पोलिस कर्मचार्यांच्या वागणुकीत गंभीर दुर्लक्ष आणि कामाच्या अडचणींचा संदर्भ आला होता. याशिवाय, दोन पोलिस कर्मचारी त्यांच्यावरील कार्यात गंभीर दुर्लक्ष आणि असंवेदनशीलतेमुळे निलंबनास पात्र ठरले. त्यांनी पोलिसी कामकाजातील आवश्यक नियम आणि कायद्याचे उल्लंघन केले होते, म्हणून त्यांना सेवेतून बरखास्त केले.

## तरुणाची आत्महत्या

**विदर्भ केसरी।**

सोलापूरमध्ये मागील सहा वर्षांपासून असलेल्या प्रेमसंबंधांना लग्नाची जोड न मिळाल्याने आणि मुलीच्या कुटुंबीयांनी नकार दिल्याने, एका 28 वर्षीय तरुणाने नैराश्यातून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हरीश भास्कर बंडी (रा. वल्लभनगर, सोलापूर) असे या मृत तरुणाचे नाव आहे.

# सत्तेचे गणित बिघडले; बेरजेचे गणित जमले

**विदर्भ केसरी। विरार**

: वसई-विरारमध्ये एकापेक्षा जास्त नगरसेवक निवडून आणण्याची राजकीय शक्ती नसलेल्या भाजपने यावेळी तब्बल ४४ नगरसेवक निवडून आणले. त्यामुळे बहुजन विकास आघाडीच्या महापालिकेच्या बालेकिल्ल्यात प्रबळ विरोधक म्हणून तरी आता भाजपचे नाव घेतले जात आहे. केंद्र आणि राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीचे शासन महापालिकेत असावे, आणि ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून वसई-विरारचा विकास व्हावा, असा प्रयत्न भाजप नेत्यांनी केला. मात्र बहुजन विकास आघाडीच्या शिट्टीने भाजपचे तिसरे इंजिन रोखले. असे असले तरी ४४ नगरसेवकांचा मोठा डबा मात्र भाजपने डबल इंजिनच्या जोरावर काम करण्यासाठी वसई-विरारच्या राजकारणात पहिल्यांदा आपल्या इंजिनसोबत जोडून घेतला आहे.



आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळख असलेल्या पालघर जिल्ह्याची मोठी राजकीय ओळख म्हणजे माजी आमदार हितेंद्र ठाकूर आणि त्यांचा बहुजन विकास आघाडी हा पक्ष. अनेक ग्रामपंचायती, पंचायत समिती, नगरपरिषद राजकारणात गेली ३५ वर्ष बहुजन विकास आघाडीचेच एकहाती वर्चस्व आहे. वसई-विरार महापालिका झाल्यानंतर दोन्ही वेळा महापालिकेवर बहुजन विकास आघाडीचा झेंडा राहिला. बोईसर, नालासोपारा आणि वसई या तीन विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीचेच आमदार अशी राजकीय आणि संघटनशक्ती असलेल्या बहुजन विकास आघाडीला २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मात्र मोठा हादरा बसला. बहुजन विकास आघाडीचे विधानसभेचे तीनही गड महायुतीच्या उमेदवारांनी जिंकले.

त्यानंतर १३- १४ महिन्यातच झालेल्या वसई-विरार महापालिका निवडणुकीत २०१५ च्या तुलनेत नगरसेवकांची संख्या घटली असली तरी बहुजन विकास आघाडीने ७१ नगरसेवकांच्या माध्यमातून तिसऱ्यांदा महापालिकेवर आपला झेंडा फडकवला.

या निकालाने २०२९ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीबाबत बहुजन विकास आघाडीच्या समर्थकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत, तर दुसरीकडे सतत १० वर्ष महापालिकेच्या सभागृहात केवळ एक नगरसेवक राहिलेल्या भाजपला ४४ असा मोठा आकडा असलेले नगरसेवक निवडून आणण्यात यश आल्याने भाजपच्या गोटातही सत्ता मिळाली नाही याचे एवढे दु:ख नाही. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने काही भागात अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे असे संकेत या निकालाने दिले आहेत.

**■ सर्वांगीण विकासासाठी समन्वय महत्वाचा :** **महापालिकेत आता बहुजन विकास आघाडी आणि राज्य आणि केंद्र शासनात महायुतीची सत्ता आहे. नवनिर्वाचित महापौर अजीव पाटील हे पदावर विराजमान होताच त्यांनी सर्वांना सोबत घेऊन वसई-विरारचा विकास करण्याची ग्वाही दिली आहे. महापालिका क्षेत्रात तीन आमदार येतात. त्यामुळे विकासकामांसाठी आमदार आणि महापौर यांच्यामधील समन्वय महत्वाचा राहणार आहे. अतिक्रमित मालमत्ता धारकांना शास्ती, ओसी धोरण, झोपडपट्टी पुनर्विकास, शहराच्या कानाकोपऱ्यात पाणी पुरवठा, वाहतूक कोंडी, फेरीवाला धोरण, पालिका कर्मचाऱ्यांना नियमित करणे आणि उत्पन्न वाढ अशा अनेक बाबी महापालिकेला भविष्यात कराव्या लागणार आहेत. त्यामुळे या सर्व कामांसाठी कोणाची काय भूमिका राहणार हे तर येणारा काळच सांगणार आहे. पक्ष संघटन वाढविण्यासाठी दोन्ही राजकीय पक्षांनी खुशाल प्रयत्न करावेत, मात्र वसई-विरारच्या नागरिकांसाठी मतभेद न करता विकासाचे इंजिन सुसाट पळवावे, अशी अपेक्षा मतदारांकडून केली जात आहे.**

## भारत फ्रान्सकडून करणार १०० राफेलची खरेदी

**विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

शत्रुराष्ट्रांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारत मोठया प्रमाणावर शस्त्र आणि दारूगोळा खरेदी करण्याची तयारी करीत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संरक्षण अधिग्रहण परिषद (डीएसी) लष्करासाठी शंभरपेक्षा जास्त राफेल लढाऊ विमाने, पी-८ आय मरिटाइम पॅट्रोल आणि अंटी सबमरिन वारफेअर एअरक्राफ्ट तसेच मरिन गॅस टर्बाईन इंजिनसह विविध साहित्य खरेदी करण्याची तयारीत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात संरक्षण मंत्रालयासाठी ७ लाख ८४ हजार ६७८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यातील २ लाख १९ हजार ३०६ लाख कोटी रुपये शस्त्रसाठा लढाऊ विमाने, अत्याधुनिक शस्त्रे, जहाज, पाणबुड्या, ड्रोन आदींवर खर्च केला जाणार आहे.

### फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन भारतात येणार

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन १९ आणि २० फेब्रुवारी रोजी दिल्लीत आयोजित करण्यात येणा-या एआय इम्पॅक्ट समिटसाठी भारतात येत आहेत. मॅक्रॉन भारतात येण्यापूर्वी राफेल विमाने खरेदी प्रस्तावाला तत्त्वत: मान्यता घेतली जाऊ शकते. याशिवाय, अमेरिकेकडून फायटर जेट विमाने खरेदी करण्याच्या रखडलेल्या प्रस्तावावरही पुनर्विचार केला जाणार आहे अशी माहिती सूत्रांनी शनिवारी दिली. यासाठी डीएसीची महत्त्वाची बैठक पुढील ३ आठवड्यात दिल्लीत होणार आहे. सुरक्षा दलासाठी शस्त्रे खरेदी करण्याचा निर्णय घेणारी सर्वोच्च संस्था म्हणजे डीएसी होय.

# वाढीव वेतनाचा हप्ता मिळेना

## एसटी कर्मचा-यांत नाराजी, तीव्र आंदोलनाचा इशारा

**विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**

एसटी कर्मचा-यांना नियमित वेतन मिळाले असले तरी वाढीव वेतनाचा फरक हप्ता न मिळाल्याने राज्यभर संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य सरकारने दिलेल्या आश्वासनानंतरही हप्ता न दिल्याचा आरोप करत महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने ३ दिवसांत रक्कम न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस, श्रीरंग बरगे यांनी दिला.

एसटी महामंडळाच्या कर्मचा-यांच्या वेतनासाठी दरमहा सुमारे



४७५ कोटी रुपयांची आवश्यकता असते. त्यासोबतच वाढीव वेतनाच्या फरकासाठी ५८ कोटी ३० लाख रुपयांची अतिरिक्त रक्कम लागते. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीचा फरक दरमहा सुमारे ६५ कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, गेल्या २ महिन्यांपासून सरकारकडून ही रक्कम प्राप्त झालेली नाही.

एसटीवर सध्या ४२०० कोटी रुपयांची वैधानिक देणी प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत वाढीव वेतनाचा हप्ता न देणे ही कर्मचा-यांची अवहेलना असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. येत्या तीन दिवसांत सरकारने निधी न दिल्यास रीतसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला.

# 12 फेब्रुवारीला देशव्यापी संप

**विदर्भ केसरी। अमरावती**

केंद्र सरकारच्या कामगारविरोधी आणि कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांविरोधात देशातील केंद्रीय कामगार संघटना व फेडरेशनने १२ फेब्रुवारी रोजी देशव्यापी संपाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समितीने या संपात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

अनेक वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेले कामगार हिताचे ४१ कायदे केंद्र सरकारने रद्द केले आहेत.



त्याऐवजी कामगारविरोधी आणि भांडवलदारांच्या हिताच्या ४ नवीन श्रम संहिता आणल्या आहेत. या श्रम संहितांच्या अंमलबजावणीची अधिसूचना २१ नोव्हेंबर रोजी काढण्यात आली आहे.

या नवीन श्रम संहितांमुळे कामगारांचा युनियन स्थापन करण्याचा, किमान वेतन मागण्याचा किंवा पेन्शनसारखी सामाजिक सुरक्षा मागण्याचा अधिकार संपुष्टात आला आहे. याशिवाय, ग्रॅच्युइटी, भविष्य निर्वाह निधी आणि बोनस यांसारख्या हक्कांवरही गदा आली आहे. स्थायी कामगारांऐवजी 'फिक्स टर्म एम्प्लॉयमेंट'द्वारे केवळ ४ ते ५ वर्षांसाठी कामगारांना कामावर ठेवले जाईल आणि त्यानंतर त्यांना कधीही कमी केले जाऊ शकते. या कामगारविरोधी ४ श्रम संहितांविरोधात १० केंद्रीय कामगार संघटना आणि ११ फेडरेशनने हा देशव्यापी संप घोषित केला आहे. हा संप कामगार, शेतकरी आणि शेतमजुरांचा आहे. अमरावतीमध्ये, मोर्चाचा शुभारंभ इर्विन चौकातून दुपारी १.३० वाजता होईल. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर तेथे दोन तास धरणे सत्याग्रह करण्यात येणार आहे. या देशव्यापी संपात आयटक, सीटू आणि इतर संघटना सहभागी होत आहेत. यात केंद्रीय कर्मचारी, बँका आणि एलआयसीचे कर्मचारी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, शालेय पोषण आहार कामगार, बांधकाम कामगार तसेच किसान सभा आणि शेतमजूर संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# सोलापूरात मतदानानंतर ईव्हीएम मशीन मिळाल्या ढाब्यावर

**विदर्भ केसरी। सोलापूर :**

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी निवडणूक पार पडली. ७ जानेवारी रोजी मतदान झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात एका ढाब्यावर ३ ईव्हीएम मशीन आढळून आल्याने खळबळ उडाली. हा प्रकार समोर आल्यानंतर निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनीही तीन ईव्हीएम मशीन आढळून आल्याच्या प्रकाराला दुजोरा दिला आहे. या मशीन मतदानासाठी वापरल्या गेलेल्या नाहीत असे त्यांनी सांगितले.



सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ मतदारसंघात हा प्रकार घडला आहे. मोहोळ शहराजवळ असलेल्या एका ढाब्यावर ईव्हीएम मशीन आढळून आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) पक्षाचे नेते उमेश पाटील यांनी हा प्रकार समोर आणला. स्वराज्य बार अँड हॉटेल परिसरात संशयास्पद प्रकार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर उमेश पाटील कार्यकर्त्यांसह तिथे पोहोचले होते. मोहोळमधील या प्रकारावर उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख म्हणाले, मशीन ढाब्यावर आढळणे हा प्रकार दुर्दैवी आणि गंभीर आहे. या प्रकरणी आम्ही संबंधितांवर कारवाई करणार आहोत. आढळून आलेल्या ईव्हीएम मशीन अतिरिक्त होत्या. त्या मतदानासाठी वापरण्यात आलेल्या नाहीत असा खुलासा त्यांनी केला. झोनल अधिका-यांकडे अतिरिक्त दोन मशीन ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, वाहन चालक आणि अधिकारी यांच्यात संवाद न झाल्याने हा प्रकार घडला असावा. त्या मशीन स्ट्राँग रुममध्ये स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

# महिलांना मंगळसूत्र उतरवायला लावल्याने वाद पेटला

## ⏭ मुख्यमंत्र्यांचा कडक इशारा, चौकशी सुरू!

**विदर्भ केसरी। छत्रपती संभाजीनगर :**

केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षेतील महिला उमेदवारांना, परीक्षा हॉलकडे जाताना, त्यांच्याकडील मंगळसूत्र काढायला लावण्याच्या प्रकारावर, राज्यात संतापाची लाट पसरली आहे. परीक्षा की अपमान? असा प्रश्न केला जात आहे.

परीक्षा पर्यवेक्षकांच्या या कार्यपद्धतीवर संतापाची लाट उसळली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'ऍक्शन मोड'वर आले आहे. 'झालेल्या प्रकारावर योग्य सूचना दिल्या जातील तसेच चौकशी केली जाईल,' असे संकेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अहिल्यानगर इथं दौ-यावर होते. सुपा एमआयडीसी इथं तौरल इंडिया प्रकल्पाचं उद्घाटन झालं. यानंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी संवाद साधला. छत्रपती संभाजीनगरमध्ये उळएळ परीक्षेदरम्यान महिला परीक्षार्थ्यांना मंगळसूत्र काढण्याच्या प्रकारावर, मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाल् अशा प्रकारच्या तक्रारी मागच्याही काळात आल्या होत्या. नेमकं काय झालं, या संदर्भात मी नेमकी माहिती घेईल. मागच्या वेळेस चौकशी केली असता, परीक्षा घेणा-या यंत्रणेकडून सांगण्यात आलं की, परीक्षेत गैरप्रकार करण्यासाठी वेगवेगळे प्रकार केले जातात, 'इक्विपमेंट' लपवले जातात. असं करणं पण देखील योग्य नाही. या संदर्भात अधिक काळजी घेतली जाईल. योग्य सूचना दिल्या जातील आणि चौकशी केली जाईल.

६ फेब्रुवारीला सीटीईटी परीक्षेच्या वेळी, छत्रपती संभाजीनगरमधील परीक्षा केंद्रांवर सुरक्षारक्षकांनी धातूचे साहित्य आत नेता येणार नाही, असे सांगत महिलांना मंगळसूत्रे, अंगठ्या आणि इतर दागिने काढण्याची सक्ती केली. यामुळे परीक्षा केंद्रावर गोंधळ उडाला. परीक्षार्थी



महिला आणि त्यांच्याबरोबर आलेल्या नातेवाईकांची या मुळे धावपळ उडाली. हा कोणता नियम आहे? अशी विचारणा केली. असा लेखी नियम आहे का? अशी मागणी महिला उमेदवारांबरोबर आलेल्या नातेवाईकांनी केली.

याचवेळी दागिने काढून ठेवण्यासाठी नातेवाईक सोबत नसलेल्या महिलांना उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागला. यातून परीक्षा केंद्रावर अधिकच वाद उफळला. अनेक महिला उमेदवारांना चांगलाच मनस्ताप झाला. परीक्षा केंद्रावर या सक्तीमुळे महिलांमध्ये असंतोष निर्माण झाला आणि सुरक्षिततेच्या नावाखाली ही अडवणूक चुकीची असल्याची भावना व्यक्त केली

# अखंड भारताचा उदय होईल, भारत तोडण्याची भाषा करणारेच तुटतील : डॉ. मोहन भागवत

**विदर्भ केसरी। मुंबई :**

भारत तोडण्याचा विचार करणारे स्वतःच तुटतील; हा १९४७ चा भारत राहिलेला नाही. आगामी २०४७ मध्ये अखंड भारताच्या उदयाची कल्पना आपण सर्वांनी करायला हवी, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. संघाच्या स्थापनेच्या १०० वर्षांच्या निमित्ताने मुंबईत आयोजित 'नवे क्षितिज' या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात ते बोलत होते.

डॉ.भागवत यांनी समाज, राष्ट्रीय एकात्मता, आरक्षण, लोकसंख्या संतुलन, भ्रष्टाचार, तंत्रज्ञान, शेती आणि अर्थव्यवस्था या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. गुंडगिरी ही संपूर्ण समाजाची चूक नसून समाज सजग राहिल्यास विध्वंसक प्रवृत्ती आटोक्यात आणता येतात, असे त्यांनी सांगितले. हिंदू आणि शीख समाजातील नातेसंबंधांवर बोलताना त्यांनी दोन्ही समाजांमध्ये रक्तसंबंध तसेच रोटी-बेटीचे नाते असल्याचे नमूद केले. श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संपूर्ण देशातील संतांची वाणी असल्याचे



सांगत हिंदू-शीख वेगळे असल्याचा विचार चुकीचा असून आपण सर्व एकच आहोत, असे ते म्हणाले.

आरक्षणाबाबत बोलताना त्यांनी संविधानानुसार असलेल्या सर्व आरक्षणांना संघाचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. जातीय भेदभाव पूर्णपणे नष्ट व्हायला हवा, असे सांगत, ज्यांनी हजारो वर्षे विषमता सहन केली त्यांच्यासाठी काही काळ सहन करणे हा स्वस्त सौदा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. आजची राजकीय व्यवस्था ही मतांसाठी चालते, अशी टीकाही त्यांनी केली.भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर केवळ कायदे आणि शिक्षांमुळे भ्रष्टाचार संपणार नाही; संस्कारांमुळेच तो नष्ट होईल, असे ते म्हणाले. लोकसंख्या संतुलनाबाबत विवाह हा संस्कार असून तो जबाबदारीने निभावला पाहिजे, असे सांगत जबरदस्तीचे धर्मांतर आणि घुसखोरी ही असंतुलनाची प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वेच्छेने होणाऱ्या धर्मांतराला विरोध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. नवीन तंत्रज्ञान आणि एआयच्या युगात रोजगाराच्या संधी कमी होऊ नयेत, यासाठी योग्य धोरणांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. हाताने काम करणाऱ्यांचा सन्मान वाढवणे आणि अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# श्रीलंकेच्या फिरकीपुढे आयर्लंडची शरणागती

**विदर्भ केसरी। कोलंबो :**

टी-२० विश्वचषक २०२६ च्या अत्यंत चुरशीच्या सामन्यात यजमान श्रीलंकेने आयर्लंडचा २० धावांनी पराभव करत विजयाची मोहोर उमटवली. श्रीलंकेच्या फिरकी जोडीने — वानिंदू हसरंगा आणि महेश तीक्षणा — केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर आयर्लंडला १४३ धावांत रोखण्यात यश आले.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला उतरलेल्या श्रीलंकेने २० षटकात १६३ धावांचे सन्मानजनक आव्हान उभे केले. यष्टीरक्षक कुशल मेंडिसने ४३ चेंडूंत संयमी ५६ धावांची नाबाद खेळी केली. तर डावाच्या अखेरीस कामिंदू मेंडिसने अवघ्या १९ चेंडूंत ४४ धावांची वादळी खेळी करत



संघाला मोठी धावसंख्या गाठून दिली. नंतर १६४ धावांचा पाठलाग करताना आयर्लंडने ८ व्या षटकापर्यंत ५६ धावा करत चांगली सुरुवात केली होती. मात्र, श्रीलंकेच्या फिरकीपटूंनी सामन्याचे चित्र बदलले.

वानिंदू हसरंगाने ४ षटकात २५ धावा देत ३ महत्त्वाचे बळी घेतले. त्याने स्थिरावलेल्या हॅरी टेक्टरला (४०) बाद करत आयर्लंडचे कंबरडे मोडले. महेश तीक्षणाने ४ षटकात केवळ २३ धावा देत ३ फलंदाजांना तंबूत धाडले. तसेच मथीशा पाथिरानाने अंतिम षटकात भेदक मारा करत २ बळी घेतले आणि आयर्लंडचा डाव १९.५ षटकात १४३ धावांवर संपुष्टात आणला. आयर्लंडकडून रॉस अडायर (३४) आणि हॅरी टेक्टर (४०) यांनी लढा दिला, पण मधली फळी एकापाठोपाठ एक कोसळल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. १०५/३ वरून आयर्लंडचा संघ १४३ धावांत सर्वबाद झाला.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ | २

## अग्रलेख

# आडवा टँकर

१७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही?

आधी 'इंडिगो' आणि आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाती कोंडीने पायाभूत सुविधा खासगी संस्थांच्या हाती किती प्रमाणात द्याव्यात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगीकरणानंतरच्या या सेवांच्या कार्यक्षमतेचं गुलाबी चित्र रंगवताना बहुतांश वेळा पाश्चिमात्य देशातील खासगी सेवांचा दाखला दिला जातो. तो पूर्णांशाने नसला, तरी काही प्रमाणात खरा असतो. त्याला कारण आहे, तिथले नागरिक आणि ग्राहक हक्क, विमा कंपन्यांचा विस्तार आणि गरज पडल्यास त्यांचे कान धरण्यासाठी तत्पर न्यायव्यवस्था आहे. आपल्याकडे यातलं काहीच नाही. तरीही वेगाने खासगीकरण; काही क्षेत्रात तर मक्तेदारीकरण सुरू आहे. अगदी सुरुवातीलाच असे अनेक धक्के बसले आणि धोके स्पष्ट दिसत असले, तरी देशात कोणीच जागं व्हायला तयार नाही, असं दुर्दैवाने दिसतं आहे. विविध क्षेत्रांतील खासगीकरणाचा टक्का वाढवताना त्या प्रमाणात नियंत्रक यंत्रणांना सक्षम आणि प्रभावी करणं आवश्यक आहे. आधी 'इंडिगो' आणि त्यानंतर मुंबई - पुण्यादरम्यानची वाहतूक कोंडी, नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर होत असलेली मोबाईल नेटवर्कची अडचण, खासगी बसचे देशभर सुरू असलेले भयानक अपघात... या मालिकेत भर टाकण्यासाठी आणखी कितीतरी दुर्घटना आहेत. पण, यातल्या कुठल्या घटनेने संबंधित क्षेत्राची नियंत्रण यंत्रणा बळकट केली गेली? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर देण्यासाठी मुद्दलात काहीही नाही! कफ सिरप प्रकरणातील एका बालकाचा २२८ दिवस झुंजल्यानंतर परवाच मृत्यू झाला. इतके बळी जाऊनही या प्रकरणात ज्या यंत्रणांनी डोळेझाक केली, त्यातल्या किती यंत्रणांवर कारवाई झाली? या यंत्रणांच्या नेहमीच्या निष्काळजीपणाला लोक आता सरावले आहेत. त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. पण, जेव्हा अशा भयंकर दुर्घटना घडतात, तेव्हा त्याचं निमित्त करून तरी या यंत्रणांना; गलेलठ्ठ पगार आणि इतर कमाई करणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करा, एवढीच जनतेची माफक अपेक्षा आहे. मुंबई - पुणे वाहतूक कोंडीसाठी जबाबदार कोण? हेच अजून स्पष्ट होत नाही, यासारखं दुर्दैव नाही. पायाभूत सेवांचा वेगाने विस्तार होतो आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. नवनवे प्रकल्प आखले जात आहेत, त्यांची भूमिपूजनं होत आहेत, त्यासाठी निधीच्या भरीव तरतुदी जाहीर होत आहेत, परदेशी गुंतवणुकीचा वाटाही वाढतो आहे, या सगळ्या कामगिरीबाबत समाधान म्हणूनच राज्यातल्या महायुती सरकारवर महाराष्ट्रातला मतदार पुनःपुन्हा विश्वास व्यक्त करतो आहे, महायुतीला निर्विवाद कौल देतो आहे. विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या या वेगामुळेच बहुसंख्य जनता केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारची समर्थक झाली आहे. धोरणकर्ते देशाला नवनवीन स्वप्नं दाखवून त्याच्या अंमलबजावणीचे साक्षात्कार घडवत असताना या प्रकल्पांच्या दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा जर गहाळ राहणार असतील, तर त्याचं खापर विनाकारण राजकीय नेतृत्वावरच फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज्यातल्या सरकारने असे प्रसंग विशेष गांभीर्याने घेऊन असल्या निष्काळजी, गाफीलपणाची जबाबदारी शक्य तितक्या लवकर निश्चित करून संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि ते लोकांच्या निदर्शनासही आलं पाहिजे. मुंबई - पुणे महामार्ग हा देशातील बहुचर्चित द्रुतगती महामार्ग आहे. हा महामार्ग मुंबई आणि पुणे या देशातल्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडतोच; पण मुंबईचा दक्षिण भारताशी भूपृष्ठावरून संपर्क याच रस्त्याने होतो. रोज सरासरी ५० हजार वाहनं या महामार्गावरून प्रवास करतात. या ५० हजारांत छोट्या चारचाकी गाड्यांपासून मल्टी ॲक्सेल महाकाय मालट्रकचाही समावेश असतो. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ या महामार्गाची टोल वसुली एकाच कंपनीकडे आहे. ही कंपनी आता देशभर या स्वरूपाची आणखीही काम करते आहे. इतका अनुभव गाठीशी असल्यानंतर या महामार्गावरून कोणकोणत्या प्रकारची वाहतूक होते, त्यात काय जोखीम आहे, आपत्ती व्यवस्थापनाचे कोणते प्रश्न त्यातून निर्माण होऊ शकतात, याची माहिती या कंपनीकडे असायलाच हवी. हा महामार्ग ज्या सरकारी उपक्रमाच्या मालकीचा आहे, ते राज्य रस्ते विकास महामंडळ याबाबत अधिक जागरूक असायला हवं. दुर्घटना घडून २४ तास उलटून गेल्यानंतर आपल्या हालचालींची माहिती चार-पाचच काय, देशातल्या सगळ्या भाषांत दिली, तरी या महामंडळाची कार्यक्षमता त्याने पटवून देता येणार नाही! प्रोपेनसारखा १७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? या संदर्भातल्या मार्गदर्शक सूचना केवळ कागदांवर, फायलीत गुंडाळून ठेवण्यासाठीच आहेत का? रस्त्यात आडव्या झालेल्या या टँकरमुळे २०-२२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. अनेकांच्या आयुष्याची खोटी झाली. मालाचं प्रचंड नुकसान झालं. महानगरांची जीवनावश्यक पुरवठ्याची साखळी तुटली. ध्यानीमनी नसताना रस्त्यात अडकलेल्यांची अक्षरशः दैना झाली. याची नुकसानभरपाई कोणी कोणाला द्यायची? ज्यांनी अपघाताची कल्पना देऊन वेळीच वाहतूक रोखली नाही, त्यांच्या बेजबाबदारपणाची शिक्षा काय ठरवायची? निदान मुंबई, पुण्यातल्या जनतेला तरी आज हेच प्रश्न छळत आहेत. त्यांची उत्तरं जितक्या लवकर मिळतील, तेवढं बरं.

# नूतन नगराध्यक्षांचा धडाका !

### शपथविधीच्या दिवशीच रंगणार नांदगाव खंडेश्वरात 'जनता दरबार '; नागरिकांच्या समस्या घेणार जाणून

**विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर (तालुका प्रतिनिधी)**




नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतीच्या नूतन नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारताच जनहितार्थासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. प्रभाग क्रमांक १४ च्या नगरसेविका सौ. प्रांजली राहुल गुल्हाने यांनी नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी मा.मुख्याधिकारी नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर दिलेल्या निवेदनाची तातडीने दखल घेत, नगराध्यक्षांनी आपल्या शपथविधीच्या दिवशीच म्हणजे सोमवार दिनांक ९/०२/२०२६ रोजी जनता दरबार हाच आमचा पदभार, हा जनहिताचा संदेश देऊन 'जनता दरबार' आयोजित करून प्रशासकीय कामाला वेग देण्याचे महत्वाचे कार्य केले आहे.

नगरसेविकेच्या निवेदनाला यश नगरसेविका सौ. प्रांजली गुल्हाने यांनी दिनांक ५/०२/२०२६ रोजी मुख्याधिकाऱ्यांना पत्र देऊन नगर पंचायत क्षेत्रात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पथदिवे यांसारख्या मूलभूत समस्यांबाबत तक्रारींचे निवारण करण्यासाठी 'जनता दरबार' भरवण्याची मागणी केली होती. प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक व्हावे आणि नागरिकांना कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, हा यामागचा मुख्य उद्देश होता. शपथविधीदिनीच लोकशाहीचा उत्सव नगराध्यक्षांनी शपथविधीचा सोहळा केवळ औपचारिक न ठेवता, त्या दिवशी थेट जनतेच्या समस्या ऐकण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमामुळे नागरिकांना त्यांच्या प्रलंबित मागण्या आणि तक्रारी थेट प्रशासनासमोर मांडता येणार आहे. यामुळे नगर पंचायत प्रशासन आणि नांदगाव खंडेश्वर शहरातील नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत झाला असून, प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू करणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण नगराध्यक्षांच्या या सकारात्मक भूमिकेचे आणि नगरसेविका सौ. प्रांजली गुल्हाने यांच्या पाठपुराव्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. "जनता दरबारामुळे आमचे प्रश्न आता लवकर सुटतील," अशी आशा शहरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## युवकाचा अपघाती मृत्यू

**विदर्भ केसरी।**

जळकोट शहरातील एक युवक दररोज उदगीर-जळकोट किंवा लातूर- जळकोट असा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय करीत असे, नेहमीप्रमाणे शनिवारी संध्याकाळी आपल्या मालवाहतूक करणा-या जीपने जळकोट शहरातील अनेक किराणा दुकानदाराचा माल आणत होता मात्र आष्टा मोडजवळ येतात उताराला तेलाच्या टाक्या पुढे सरकल्या, आणि थेट ड्रायव्हरच्या पाटीला येऊन टेकल्या पाठीमागून दाब आणि पुढे स्टेरिंग यामध्ये तो अडकला व यातच त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला . जळकोट शहरातील संगमेश्वर दत्तात्रय धुळशेट्टे (बोधले) हा युवक शनिवारी सकाळी जळकोट येथून किराणा माल आणण्यासाठी लातूरकडे आपली मालवाहतूक जीप घेऊन गेला होता . दिवसभर जिपमध्ये सर्व किराणा साहित्य भरले व संध्याकाळी तो जळकोटकडे निघाला मात्र चाकूर तालुक्यातील आष्टा मोड जवळ उतारावर गाडीत असलेल्या तेलाच्या टाक्या कॅबीनकडे आल्या व मागून दाब पडला. यात तो गंभीर जखमी झाला.

# वाढलेले मतदान कुणाच्या पथ्यावर ; उमेदवारांची उत्सुकता

**विदर्भ केसरी। राजगड :**

राजगड तालुक्यात ७९.३० टक्के मतदान झाले आहे आणि वाढलेले मतदान कोणाच्या पारड्यात जाणार आहे याची उमेदवारांमध्ये उत्सुकता आहे. वेल्हे खुर्द गटात एकूण १००११महिलांनी आणि ११८०२ पुरुषांनी मतदान केले आहे, असे एकूण २१८१३ लोकांनी मतदान केले आहे.

या गटात राष्ट्रवादीकडून तानाजी मांगडे, भाजपकडून शिवाजी चोरगे आणि उद्धवसेनेकडून शैलेश वालगुडे यांच्यामध्ये लढत झाली आहे.

विझर गटात एकूण १०२०३ महिलांनी आणि ११७७२ पुरुषांनी मतदान केले आहे, असे एकूण २१९७६ लोकांनी मतदान केले आहे. राष्ट्रवादीकडून अमोल नलावडे, भाजपकडून शिवराज शेंडकर, शिंदेसेनेकडून अनंता रेवणनाथ दारवटकर यांच्यामध्ये लढत झाली आहे. दोन्ही गटांमध्ये चुरशीच्या लढती झाल्या आहेत. उमेदवारांनी मतदारांसाठी विविध सुविधांमुळे मतदान वाढल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. आमदार शंकर मांडेकर यांनी दोन्ही जिल्हा परिषद गटात सभा घेतल्या, अजित पवार यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे दोन ते तीन दिवस सर्व प्रचार रखडला होता. त्यामुळे याबाबत पक्षातील उमेदवाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला असल्याची चर्चा तालुक्यात होती. दोन्ही गटात भाजपकडून पहिलेच तयारी केलेल्या उमेदवारांना संधी देण्यात आली होती, त्यांनी आधीच गटातील सर्व गावे फिरून काढली होती. माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने काँग्रेसमधील सर्व कार्यकर्ते भाजपमध्ये गेले, त्यामुळे उमेदवारांना निवडणूक तयारी सुरू करावी लागली. त्यामुळे तालुक्यातील सर्वच उमेदवारांनी मतदान वाढावे म्हणून शहरातील उमेदवारांना भेटून मतदानासाठी प्रोत्साहित केले होते.

मतदानात युवकांचा सहभाग वाढला आहे. राष्ट्रवादीकडून तिकीट न मिळाल्याने ऐन वेळी दुसऱ्या पक्षात जाऊन उमेदवारी मिळविली, त्यामुळे बंडखोरीचा फायदा कोणाला होईल याची चर्चा सध्या रंगली आहे.



# ग्राम उंबरवाडी येथे गण गण गणात बोतेचा गजर

**विदर्भ केसरी। मालेगांव**



तालुक्यातील मेडशी नाजिक असलेले अतिशय छोटस व आदिवासीं बहुल गाव उंबरवाडी येथे गेल्या दशकापासून श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त भव्य महाप्रसादचे आयोजन सर्व पंचक्रोशितील गजानन महाराज भक्ता कडून मोठ्या उत्साहाने करण्यात येत असते.या वर्षी 8 फेब्रुवारी रोजी गजानन महाराज प्रकटदिन आहे. माघ वद्य सप्तमी म्हणजे 23 फेब्रुवारी 1878 रोजी बुलडाणा येथील शेगाव येथे गजानन महाराज दिगंबर अवस्थेत लोकांच्या दृष्टीस पडले.तेव्हा पासून ह्या दिवशी प्रगटदीन महाराष्ट्रात प्रत्येक गावागावात साजरा केला जातो. मेडशी पासून पश्चिमेस तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या उंबरवाडी हे छोटंस आदिवासी बहुल गाव असून गावात श्री संत गजानन महाराज यांचं मंदिर आहे.गेल्या बारा वर्षा पासून येथे प्रगट दिनानिमित्त भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत असते.गावातील मंडळी महिला,लहान मुले,ज्येष्ठ मंडळी,वृद्ध मंडळी सर्व मिळून या महाप्रसादाचे आयोजन करत असतात.पंचक्रोशीतील भाविक ह्या दिवशी ग्राम उंबरवाडी येथे श्री संत गजानन महाराज यांच्या दर्शनासाठी आणि महाप्रसादसाठी येत असतात. त्यामुळे गावाला यात्रेचे स्वरूप येते. महाप्रसाद सुरू होण्याअगोदर गावातील भजनी मंडळी टाळ मृदंगाच्या गजरात श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीची भव्य दिव्य अशी मिरवणूक गावातून काढतात.त्यामुळे गावातील वातावरण प्रसन्न होते.यावेळेस 21 क्विंटलचा भव्य महाप्रसाद बनवण्यात आला होता या मध्ये प्रामुख्याने पुरी,भाजी, बुंदीचा समावेश होता.परिसरातील भक्ताची या महाप्रसादाला या वेळेस हजारोच्या संख्येने उपस्थिती लावली होती.या वेळी महिला स्वयंसेवकानी स्वयस्पूर्तीने महिलांना महाप्रसादचे वाटप केला.तर ह्या महाप्रसादाचे आयोजन श्री साई गजानन महाराज संस्थान उंबरवाडीच्या वतीने मोठ्या उत्साहाने करण्यात येत असते.

# कुत्र्याच्या हल्ल्याने चिमुकल्याचा मृत्यू

**विदर्भ केसरी। नसरापूर :**

ऊसतोड कामगाराच्या ५ वर्षीय मुलावर कुत्र्याने हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाला, ही घटना केंजळ (ता. भोर) येथे उघडकीस आली. दि. ७ रोजी सकाळी नऊ वाजता ही घटना घडली. वनविभागाने वन्यप्राण्याचा हल्ला नाकारून कुत्र्यानेच हल्ला केल्याचे स्पष्ट केले आहे. चाळीसगाव येथील कृष्णा किरण सोनवणे (वय ५) हे बालक आज सकाळी आई-वडिलांसह केंजळ येथील ऊस फडात कामासाठी गेले होते. कृष्णाला शौचास लागल्याने आई सरला सोनवणे यांनी त्याला शेताच्या बाजूला पाठवले. थोडा वेळ वाट पाहिली, मात्र कृष्णा उसाच्या शेतात रक्तबंबाळ अवस्थेत आढळला. भोर ग्रामीण रुग्णालयात नेले असता, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. केंजळ (ता. भोर) येथे खळबळजनक घटना; वन विभागाचा स्पष्ट खुलासा. राजगड पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून, पालकांचा जबाब घेत तपास सुरू केला आहे. परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

# इंग्लंडचा नेपाळ विरुद्ध निसटता विजय

**विदर्भ केसरी। मुंबई :**

आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत इंग्लंड त्यांच्या पहिल्याच सामन्यात सर्वात मोठ्या उलटफेरची शिकार होता होता राहिली. इंग्लंडने नवख्या असलेल्या नेपाळसमोर मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये १८५ धावांचे आव्हान ठेवले होते. नेपाळने या धावांचा पाठलाग करताना सडेतोड बॅटिंग करत शेवटपर्यंत जोरदार लढा दिला. नेपाळच्या फलंदाजांनी केलेल्या फटकेबाजीमुळे सामना रंगतदार स्थितीत पोहचला होता.

नेपाळला मोठा उलटफेर करण्यासाठी शेवटच्या ओव्हरमध्ये १० धावांची गरज होती. नेपाळने शेवटच्या बॉलपर्यंत लढा दिला. मात्र सॅम करन याने चिवट बॉलिंग केली. सॅमने ९ धावांचा यशस्वी बचाव केला. नेपाळला शेवटच्या बॉलवर ६ धावांची गरज होती. तेव्हा सॅमने हुशारीने बॉल टाकला आणि अवघी १ धाव दिली. इंग्लंडने अशाप्रकारे आपली लाज राखली आणि ४ धावांनी विजय मिळवला. तर नेपाळची झुंज अपयशी ठरली. मात्र नेपाळने या कामगिरीसह चाहत्यांची मनं जिंकली. इंग्लंडने टॉस जिंकून पहिले बॅटिंग केली. इंग्लंडसाठी जेकब बेथल आणि कॅप्टन हॅरी ब्रूक या दोघांनी सर्वाधिक धावा केल्या. जेकबने ५५ आणि हॅरीने ५३ धावांची खेळी केली. जोस बटलर याने २६ धावांचे योगदान दिले. तर अखेरच्या क्षणी विल जॅक्स याने १८ बॉलमध्ये ३९ रन्सची खेळी करत फिनिशिंग टच दिला. इंग्लंडने अशाप्रकारे ७ विकेट्स गमावून १८४ धावा केल्या.

# नराधम मुख्याध्यापकाने केला विद्यार्थिनीवर अत्याचार

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

शिक्षण क्षेत्राला आणि गुरू-शिष्याच्या पवित्र नात्याला काळीमा फासणारी संतापजनक घटना घाटंजी तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेत उघडकीस आली आहे. शाळेत सातव्या इयत्तेत शिकणाऱ्या एका १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीवर स्वतः मुख्याध्यापकानेच लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

ज्याने संस्कार करायचे, तोच 'भक्षक'बनल्याने पालकांमध्ये संतापाचा उद्रेक झाला आहे. या नराधम मुख्याध्यापकाला पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्याला २१ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. किशोर उत्तमराव मालवीय (४३, रा. चांदूरेनगर, यवतमाळ) असे या विकृत मुख्याध्यापकाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा नराधम गेल्या वर्षभरापासून विद्यार्थिनिशी दुष्कृत्य करत होता. त्याने १ मे २०२५ रोजी शाळेच्या 'डिजिटल रूम'मध्ये या चिमुकलीवर पहिल्यांदा बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्याची हिंमत वाढली. गुरुवारी, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास त्याने मुलीला काहीतरी आमिष दाखवून स्वतःच्या 'झायलो'कारमध्ये बसवले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या प्रकाराने पीडित मुलगी प्रचंड घाबरली होती. अखेर तिने धीर एकवटून घरी घडलेला प्रकार आई-वडिलांना सांगितला.आपल्या पोटच्या गोळ्यावर झालेला अत्याचार ऐकून वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता पीडितेसह घाटंजी पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार दाखल केली.

तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये आणि पोक्सो अन्वये गुन्हे दाखल केले. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी शनिवारी रात्रीच आरोपी मुख्याध्यापकाला अटक केली. ज्या कारमध्ये मुख्याध्यापकाने दुष्कृत्य केले, ती कारही पोलिसांनी जप्त केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला २१ फेब्रुवारीपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन राठोड करीत आहेत. या घटनेमुळे तालुक्यात संतापाची लाट उसळली असून, आरोपी नराधम शिक्षकाला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी पालकांनी लावून धरली आहे.

> **■ आरोपी मुख्याध्यापकाची वागणूक आणि गुन्ह्याची पद्धत पाहता, त्याने शाळेतील इतर विद्यार्थिनींसोबतही असे गैरकृत्य केले असण्याची दाट शक्यता आहे. त्या अनुषंगाने पोलीस आता कसून तपास करत आहेत. जर इतर कोणत्याही विद्यार्थिनीसोबत असा प्रकार घडला असेल, तर त्यांनी न घाबरता पुढे येऊन पोलिसांना माहिती द्यावी. त्यांची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल,' असे आवाहन घाटंजी पोलिसांनी केले आहे.**

# नियम कागदात, शहर कचऱ्यात ! नगरपालिकेचे दुर्लक्ष

## – ई-रिक्षा चालक व सफाई कर्मचारी गैरहजर;नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे स्वतः उतरले मैदानात

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी,**



**यवतमाळ** यवतमाळ शहरातील कचरा संकलन व्यवस्थेचा बोजवारा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. ई-रिक्षा चालक व सफाई कर्मचारी गैरहजर असल्याने प्रभाग क्रमांक १० मध्ये कचरा उचलला जात नसल्याचे चित्र दिसून आले.या गंभीर परिस्थितीची दखल घेत यवतमाळ नगरपालिकेचे गटनेते तथा नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी थेट मैदानात उतरून स्वतः ई-रिक्षा चालवत कचरा संकलन केले व नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या तक्रारी जाणून घेतल्या. विशेष म्हणजे यवतमाळ नगरपालिकेवर प्रशासक राज संपून भारतीय जनता पार्टीची सत्ता स्थापन होऊनही शहर स्वच्छ व सुंदर होण्याऐवजी अस्वच्छतेकडेच वाटचाल सुरू असल्याचे स्पष्ट होत आहे.

कचरा संकलनाचा ठेका मिळालेल्या ठेकेदारांवर नगरपालिकेचा कोणताही प्रभावी अंकुश नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. ठेकेदारांकडून कामगारांची नियमित उपस्थिती,वेळापत्रकानुसार कचरा उचल,ई-रिक्षांचे रोजचे फेरे,गणवेश व ओळखपत्रांची अंमलबजावणी,तसेच स्वच्छता नियमांचे पालन केले जात नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

स्वच्छ भारत अभियान,महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम तसेच कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार घराघरातून दररोज कचरा संकलन करणे,ओला-सुका कचरा वेगळा गोळा करणे,कर्मचारी नियमित हजर ठेवणे व ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करणे हे नगरपालिकेचे कर्तव्य आहे.मात्र प्रत्यक्षात या सर्व नियमांना हरताळ फासला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला.डॉ. नीरज वाघमारे यांनी "नगरपालिका प्रशासन व सत्ताधाऱ्यांनी जबाबदारी झटकून चालणार नाही. ठेकेदार,अधिकारी व कामगार यांची संयुक्त जबाबदारी निश्चित करून नियमभंग करणाऱ्यांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे,अन्यथा आंदोलन छेडले जाईल," असा इशारा दिला आहे. ही घटना म्हणजे केवळ एका प्रभागापुरती मर्यादित नसून संपूर्ण यवतमाळ शहरातील स्वच्छता व्यवस्थेच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,

Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

GOOD MORNING

# कॉटनसिटी

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## कर्जमाफीच्या हालचाली युद्ध स्तरावर

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

सेवा सहकारी संस्थांमार्फत वितरित करण्यात आलेल्या कर्जाच्या थकीत खात्याविषयी माहिती संकलनाचे काम युद्धस्तरावर सुरू आहे. यासाठी सुट्टीच्या दिवशी, जिल्हा बँकेच्या शाखा, विकास संस्था तसेच सहकार विभागाचे कार्यालय सुरू ठेवण्यात आले आहे. दोन दिवसात सर्व माहिती पोर्टलवर बँकांना अपलोड करण्याची आहे. 'शेतकरी कर्जनिवारण योजने'साठी ॲक्शन मोडवर काम सुरू झाले आहे.

महत्त्वाचे



## वटफळी येथील बौद्ध धम्म परिषदेत देवेंद्र खडसे यांना धम्म पुरस्काराने सन्मानित.

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**

दिनांक 2 व 3 फेब्रुवारी 2026 ला वटफळी तालुका नेर येथे महाबोधी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने पिता रामजी सुभेदार स्मृतिदिनानिमित्त, दरवर्षीप्रमाणे भव्य धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सामाजिक व धम्मकार्य करणाऱ्या उपासकांना धम्मभूषण, समाज भूषण पुरस्कार देण्यात येतो. संस्थेचे अध्यक्ष भदंत डॉक्टर नागघोश महाथेरो व त्यांचे सर्व आयोजक समितीच्या वतीने यावर्षीच्या धम्म परिषदेमध्ये, पुसद येथील महाबोधी बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष, फुले शाहू आंबेडकर फाउंडेशन पुसदचे अध्यक्ष, पुसद पंचायत समितीचे माजी सदस्य, आयुष्यमान देवेंद्र अंबादासजी खडसे यांना धम्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. स्थानिक उपासक उपासिकांकडून त्यांचे याबद्दल भरभरून अभिनंदन केल्या जात आहे.




## केळापुर येथे विशाल हिंदू संमेलन उत्साहात; संत-वक्त्यांचे समाजप्रबोधनपर मार्गदर्शन

**विदर्भ केसरी। पांढरकवडा:**

दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी केळापुर येथे सकल हिंदू समिती, केळापुर मंडळ यांच्या वतीने भव्य व विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाला परिसरातील नागरिक, विविध सामाजिक संस्था, युवक-युवती तसेच धर्मप्रेमी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संमेलनाचा परिसर धार्मिक वातावरणाने आणि उत्साहाने भारलेला दिसून येत होता. या संमेलनाचे प्रमुख आकर्षण म्हणून ह.भ.प. वेदाचार्य पेंदोर महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या आशीर्वचनपर भाषणातून समाजात सदाचार, संस्कार व एकात्मता यांचे महत्त्व अधोरेखित केले. धर्म, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल राखत समाज प्रबोधनाचे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून मा. डॉ. श्री नितीनजी खर्चे (अध्यक्ष, दि यवतमाळ अर्बन को-ऑप बँक, यवतमाळ) यांनी प्रभावी व विचारप्रवर्तक मार्गदर्शन केले. आपल्या उद्बोधनात त्यांनी हिंदू समाज हा पर्यावरणाचा नैसर्गिक संरक्षक असल्याचे सांगितले. त्यामुळे समाजाकडून कोणत्याही प्रकारचे पर्यावरण व जलप्रदूषण होऊ नये, यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नागरी कर्तव्यांचे पालन, स्वदेशी वस्तूंचा वापर, कुटुंबातील संस्कार व आदर्श हिंदू घराचे स्वरूप याबाबतही त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून केळापुर येथील सधन कास्तकार देवरावजी भूपतवार उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मा. जिल्हा संघचालक गोविंदजी हातगावकर यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विविध मान्यवरांच्या उपस्थितीमुळे संमेलन अधिक प्रेरणादायी ठरले. कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य नियोजनासह करण्यात आले होते. उपस्थितांनी वक्त्यांच्या मार्गदर्शनाचे स्वागत करत सामाजिक ऐक्य, पर्यावरण संवर्धन व संस्कारयुक्त जीवनशैलीचा संदेश पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सकल हिंदू समिती, केळापुर मंडळ यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.

# माता रमाईच्या त्यागाचे सदैव स्मरण करावे

## संतोष सुरवाडे यांचे आवाहन : लुंबीनी बुध्दविहार संभाजीनगर येथे रमाई आंबेडकर यांची जयंती

**विदर्भ केसरी। पुसद/**



त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचा त्याग आणी समर्पित कार्य हेच आमच्या जीवनाच सोन आहे हे आजच्या सर्वच रमाईच्या लेकिनी स्मरण करुन रमाई च्या विचाराचा वारसा समर्थ पने चालवावा.असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष संतोष सुरवाडे यानी आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडले तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना माता रमाईची खंबीर साथ आणी सहकार्य लाभल्यामुळे उपेक्षितांच्या जीवनोतथानासाठी त्यानी हाती घेतलेल्या कार्याला दिशा मिळाल्या असे प्रतिपादन आपल्या भाषणातून प्रा. डॉ.कल्याण साखरकर यानी व्यक्त केले.

लुंबीनी बुध्द विहार संभाजीनगर पुसद येथे आज गौतमी बहुउद्देशीय संस्था व लुंबीनी महीला मंडळाच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.माता रमाई आंबेडकरांनी त्याग केल्यामुळेच आपल्याला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समस्त शोषीत वंचित बहुजन समाजा साठी आयुष्यभर कार्य करीत राहीले त्याच्या कार्यात रमाईचा मोठा वाटा होता असे प्रतिपादन रमाई उद्योजक पुरस्कार प्राप्त धम्मभुषण जेष्ठ शिक्षक तथा नवनिर्वाचित शिक्षण सभापती विठ्ठलरावराव खडसे यांनी केले तर रमाई च्या विचाराचा वारसा आताच्या रमाईच्या लेकीनी न डगमगता समर्थपने आपल्या लेकरांना संस्कारक्षम बनवून चांगले शिक्षण द्यावेत हीच खरी माता रमाई आंबेडकरांना अभिवादन होईल असे विचार संभाजी ब्रिगेड चे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष मा.सुधीर भाऊ देशमुख यांनी आपल्या अभिवादन पर भाषणातून व्यक्त केले. तर माता रमाई आंबेडकरांच्या त्यागामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मोठ सामाजिक परिवर्तन करू शकले असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष व पत्रकार लक्ष्मण भाऊ काबळे यानी आपल्या सुभेछा पर भाषणातून व्यक्त केले सर्वप्रथम माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बामसेफ चे प्रशिक्षण महासचीव संतोष सुरवाडे होते तर प्रमुख उपस्थिती जेष्ठ शिक्षक न.प.शिक्षण सभापती विठ्ठलरावराव खडसे व नगरसेवक शिल्पाताई देशमुख तथा संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष मा.सुधीर भाऊ देशमुख हे होते तर प्रमुख मार्गदर्शक डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राध्यापक संघटनेचे सहसचिव प्रा. डॉ.कल्याण साखरकर.लक्ष्मण कांबळे अध्यक्ष रीपाई (आठवले) बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजेंद्र नाईक संतोष अंभोरे अध्यक्ष भीमशक्ती. विजय बहादुरे अध्यक्ष समता सैनिक दल प्रा अगमे अड जांभुळकर होते. तर कार्यक्रमाचे सुरेख आयोजन गौतमी बहुउद्देशीय संस्था व लुंबीनी महीला मंडळ संभाजीनगर पुसद च्या सर्व महीला भगीनी सह रंगनाथ भाऊ धीरे 'गजानन भाऊ धाबे नितेश खंदारे विजय गवारे सह संभाजीनगर पुसद च्या सर्वच मंडळींकडून परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुरेख आणी शिस्तबद्ध संचालन यशदा चे विषयतज्ज्ञ प्रा. अंबादास वानखडे यानी केले तर आभारप्रदर्शन मंडळाच्या सचिव सौ छायाताई कांबळे यानी केले.

## स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

गुलाम नबी आझाद उर्दू हायस्कूल,पुसद येथे विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य लक्षात घेऊन करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते.

शाळेतील शिक्षक व पुसद शहरातील प्रसिद्ध करिअर कौन्सिलर सय्यद सलमान सरांनी शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दहावीनंतर उपलब्ध असलेल्या विज्ञान, कला, वाणिज्य, आयटी, पॉलिटेक्निक, आयटीआय, स्पर्धा परीक्षा, कौशल्याधारित अभ्यासक्रम तसेच भविष्यातील रोजगाराच्या संधी याबाबत त्यांनी सविस्तर व सोप्या भाषेत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसार व क्षमतेनुसार योग्य करिअरची निवड करावी, तसेच वेळेचे पालन, नियमित अभ्यास, आत्मविश्वास व शिस्त यांचे महत्त्व लक्षात ठेवावे, असे मार्गदर्शन सय्यद सलमान सर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे देत प्रेरणादायी उदाहरणांद्वारे योग्य दिशा दाखवली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी जागरूकता निर्माण झाली व त्यांच्या भविष्यासाठी स्पष्ट दिशा मिळाली.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी सैय्यद सलमान सरांना करिअर बद्दल अनेक प्रश्न विचारातून आपल्या शंकेचे निरसरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे वरिष्ठ शिक्षक तारीक अहमद खान सरांनी सय्यद सलमान सर यांचे विद्यालयातर्फे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद सादिक सर यांनी शुभेच्छा दिल्या.

# माता रमाई यांचे विचार घराघरात पोहोचणे काळाची गरज – भुराजी तायडे

**विदर्भ केसरी। यवतमाळ**




नेताजी नगर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ ७ फेब्रुवारी रोजी त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई तसेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नामदेवरावजी घोरपडे होते. सामाजिक कार्यकर्ते भुराजी तायडे यांनी माता रमाई यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचे योगदान समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

भुराजी तायडे म्हणाले, "माता रमाई यांनी बालपणापासूनच आपल्या लहान भावंडांची आईप्रमाणे जबाबदारी सांभाळली. विवाहानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यात सुख-दुःखात खंबीर साथ दिली. त्याग, संयम आणि कुटुंबप्रेम यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे माता रमाई होय. म्हणूनच त्यांना त्यागमूर्ती राष्ट्रमाता म्हणून ओळखले जाते. बुद्ध, शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ, सावित्रीबाई, जिजाऊ आणि माता रमाई यांचे विचार घराघरात पोहोचणे ही काळाची गरज आहे."

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोनूताई लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ज्येष्ठ उपासक विठ्ठलराव वानखडे, ज्येष्ठ उपासिका द्वारकाबाई साळवे, मंडपे ताई, शशिकलाताई जोगदंडे, बीबीबाई खाडे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयोजन समितीच्या समन्वयक मंगलाताई जाधव यांनी केले, तर पुतळा समितीचे अध्यक्ष व संपादक डी. के. हनवते यांनी आभार प्रदर्शन केले.



## 'गण गण गणात बोते'चा गजर...

**विदर्भ केसरी। यवतमाळ।**

भक्तीचा महाकुंभ आणि टाळ-मृदंगाच्या गजरात, उमरसरा परिसरातील गणेश नगर येथे श्री गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव अत्यंत चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. योगिराज बहुउद्देशीय संस्था आणि राजू बोडखे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित या सोहळ्याने संपूर्ण परिसराला आध्यात्मिक रूप प्राप्त करून दिले होते. रविवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी पहाटेपासूनच भाविकांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता. सकाळी ७ वाजता जेव्हा श्रींची पालखी निघाली, तेव्हा भाविकांनी श्रद्धेने पालखी आपल्या खांद्यावर विसावून घेतली. "शेगावचा राणा" आणि "गण गण गणात बोते" या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. पारंपारिक वेशभूषेतील भाविक, टाळ-मृदंगाचा ठेका आणि वारकरी संप्रदायाचा हा अनोखा मेळ यवतमाळकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.

## विद्यार्थ्यांनी रेखाटली निसर्ग चित्र

### रंगछटांमधून विद्यार्थ्यांनी दिला निसर्ग रक्षणाचा संदेश





**विदर्भ केसरी। यवतमाळ**

येथील सामाजिक वनीकरण विभागामार्फत निसर्ग संवर्धन, वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांकरिता चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. निसर्गरम्य प्रयासवन येथे आयोजित या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व, वनीकरण, प्रदूषण नियंत्रण आणि निसर्गाचे संतुलन राखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'पर्यावरण संरक्षण', 'वृक्ष हेच जीवन', 'पाणी अडवा पाणी जिरवा', 'हरित महाराष्ट्र' अशा विषयांवर आधारित चित्र विद्यार्थ्यांनी काढली. या स्पर्धेत जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले. इयत्ता 1 ते 5 आणि इयत्ता 6 ते 9 अशा दोन गटात झालेल्या स्पर्धेत 300 हून अधिक विद्यार्थी / विद्यार्थिनी सहभागी झाले.

यावेळी सामाजिक वनीकरण विभागातील विभागीय वन अधिकारी प्राणिता पारधी, सहाय्यक वनसंरक्षक प्रिया गुल्हाने तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर मडावी व त्यांचे अधिनस्त उपस्थित वनपाल, वनरक्षक व इतर वनपरिक्षेत्र अधिकारी उपस्थित होते तसेच प्रयास वन चे अध्यक्ष डॉ. विजय कावलकर आणि त्यांचे सहकारी या उपक्रमात सहभागी होते.

# ॲनिमिया मुक्त गाव अभियान : ग्रामपंचायत अंबोडाचे प्रेझेंटेशन भोपाळ मधील विचार मंथन परिषदेत

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातील उपक्रम यवतमाळ येथील अस्मिता संस्थेकडून सादरीकरण

**विदर्भ केसरी।**




आर्णी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत अंबोडा यांनी राबविलेल्या ॲनिमिया मुक्त अभियानात सक्रिय व प्रभावी सहभाग नोंदवत उल्लेखनीय कार्य केले या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे अंबोडा गावातील महिलांमध्ये, किशोरवयीन मुलींमध्ये तसेच बालकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढून रक्तक्षय प्रतिबंधासाठी सकारात्मक परिणाम दिसून आले. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सहाय्यक ट्रस्ट मुंबई यांच्या माध्यमातून भोपाळ (मध्यप्रदेश) येथे आयोजित राज्यस्तरीय मंथन कार्यशाळेतील प्रेझेंटेशनमध्ये अंबोडा गावाचे सादरीकरण करण्यात आले. ज्यामध्ये गावाने केलेल्या उपक्रमांची, जनजागृती मोहिमांची आणि आरोग्य सुधारण्यासाठी राबविलेल्या योजनांची सविस्तर माहिती मांडण्यात आली. या कार्याबद्दल अस्मिता संस्था, यवतमाळ तसेच ग्रामपंचायत अंबोडा यांना गौरवपूर्वक पुरस्कृत करण्यात आले. यावेळी अस्मिता संस्थेच्या अध्यक्षा संगीता गायकवाड व समन्वयक वैभव गायकी यांनी सन्मान स्विकारला.

या राज्यस्तरीय कार्यशाळेमध्ये महाराष्ट्र, राजस्थान, बिहार,मध्यप्रदेश येथील विविध संस्था चे प्रतिनिधी व मध्य प्रदेश येथील विद्यापीठातील कुलगुरू व प्राध्यापक सुद्धा सहभागी झाले होते. यावेळी येथे सेंद्रिय पोषण परसबाग अनेमिया मुक्त गाव मोहीम याविषयी चर्चा करण्यात आली तसेच यावेळी या कार्यक्रमादरम्यान विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी एनिमिया व सेंद्रिय पोषण परसबागेवर कार्य केलेल्या ची प्रदर्शनी सुद्धा भरवण्यात आली. यावेळी या प्रदर्शनीमध्ये बीज गुणन केंद्र पोस्टर प्रदर्शन लावण्यात आले होते.

### ॲनिमिया मुक्त अभियान निरोगी समाज निर्मितीसाठी आवश्यक

**ॲनिमिया मुक्त अभियानाचे महत्त्व अत्यंत व्यापक असून निरोगी समाजनिर्मितीसाठी ते मूलभूत पाऊल मानले जाते. रक्तक्षयामुळे होणारी अशक्तता, थकवा, मातामृत्यूदर आणि बालकांच्या विकासातील अडथळे यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी योग्य आहार, लोहयुक्त गोळ्यांचे सेवन, नियमित आरोग्य तपासणी आणि जनजागृती अत्यावश्यक आहे. ग्रामस्तरावर सातत्यपूर्ण प्रयत्न, महिला व बालकांच्या आरोग्याविषयी संवेदनशीलता आणि समुदायाचा सहभाग यामुळे ॲनिमिया निर्मूलनाचा मार्ग अधिक सुलभ होतो. अंबोडा गावाने दाखविलेला हा आदर्श इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरत असून निरोगी, सशक्त आणि जागरूक समाजाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. अशीच एकजूट आणि सातत्य टिकून राहिल्यास ॲनिमिया मुक्त भारताच्या संकल्पनेला निश्चितच बळ मिळेल. - विजयकुमार एस.ठेंगेकर ग्रामपंचायत अधिकारी,अंबोडा**

## राज्यात अन्न व औषध प्रशासनाने तातडीने छापे टाकावेत

### मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अन्नपदार्थांमध्ये रासायनिक घटकांचा वापर वाढत असल्याची गंभीर बाब समोर येत असून यावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रव्यापी मातृभूमी भेदभाव निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष भिमराव राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ई-मेलद्वारे पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, बाजारात विक्रीस येणारे चणे, दूध, भाजीपाला, डाळी तसेच ज्वारी, भात, गहू, तांदूळ, बाजरी, मका आदी धान्यांमध्ये रसायनांचा वापर होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा अन्नपदार्थांच्या सेवनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित मंत्री, राज्यमंत्री, तहसीलदार, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांनी समन्वय साधत तातडीने छापे टाकावेत, अशी विनंतीही राठोड यांनी केली आहे.

या निवेदनाची प्रत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही पाठविण्यात आली असल्याची माहिती अर्जदाराने दिली आहे.

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ 

## १३२ वाहनचालकांकडून एक लाखाचा दंड वसूल

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

ग्रामीण भागात अवैध प्रवासी वाहतुकीत वाढ झाली. शिवाय बेशिस्त वाहनचालकांची अरेरावीसुद्धा वाढली. त्या पार्श्वभूमीवर ग्रामीण वाहतूक पोलिसांनी १३२ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली. त्यांच्यावर एक लाख ३०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. ग्रामीण पोलिस वाहतूक शाखेचे निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक संतोष मुंदाने, उपनिरीक्षक दीपक साबळे, सहायक पोलिस उपनिरीक्षक सुनील मलातपुरे, नीलेश तायडे यांच्या पथकाने जिल्ह्यातील धारणी, नांदगावखंडेश्वर व मोर्शी भागात अवैध प्रवासी वाहतूक करणारे वाहन चालक, विना हेल्मेट वाहन चालविणारे दुचाकीस्वार, अवैध पार्किंग करून नागरिकांना वेठीस धरणारे वाहनचालक, अशा १३२ वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

# चंद्रपुरात महापौरपदावरून संग्राम सुरू!

## काँग्रेसच्या दोन्ही गटात वाटाघाटी; महापौर भाजपचाच असणार, सुधीर मुनगंटीवारांचा दावा

**▸विदर्भ केसरी।**





चंद्रपूर महापालिकेवर आपलाच महापौर बसवण्याससाठी काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार आणि धानोरकर गटाने दिल्लीत पक्षश्रेष्ठींसमोर सत्तेच्या वाटाघाटी केल्या आहेत. काँग्रेसची तिकडे महापौर पदाची तयारी सुरू असतानाच इकडे शिवसेना ठाकरे गटाच्या मनात वेगळेच काही शिजत असल्याचे समोर आले आहे. भाजपने शिवसेना ठाकरे गटाला ऑफर दिली असल्याचे समजते. तसेच सत्तास्थापनेची आमची पूर्ण तयारी झाली असल्याचे सांगत महापौर आमचाच होईल, असा दावा भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे.

चंद्रपूर शहर मनपात भाजपचा महापौर होण्याच्या दृष्टीने सर्व चर्चा झाल्या असून उद्या दुपारपर्यंत निश्चित घोषणा होईल, असा गौप्यस्फोट सुधीर मुनगंटीवार यांनी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याशी चर्चा झाली आहे. संगीता खांडेकर आमच्या अधिकृत उमेदवार आहेत. पाठिंबा देणाऱ्या पक्षांशी चर्चा अंतिम टप्प्यात आहे. चर्चा पूर्ण झाली की लेखी स्वरूपात करार होणार असून भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष हरिश शर्मा हा करार करणार असल्याची माहिती मुनगंटीवार यांनी दिली आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, चर्चा कॅमेरासमोर होत नाही. त्यामुळे ती बाहेर सांगणे शिष्टाचाराचा भंग होईल. आमचे खांडेकर महापौर होतील हे नक्की. मी स्वतः निधी आणि विकास कामांबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी बोललो आहे. पूर्ण शक्तीनिशी मानपाच्या पाठीशी उभे राहू असेही मुनगंटीवार म्हणाले. तसेच काँग्रेसशी निवडणूक पूर्व आघाडी असलेल्या पक्षांशी आमचा संपर्क झाला आहे. मात्र ते सध्या थेट पद्धतीने आम्हाला पाठिंबा देण्याच्या मनःस्थितीत नाहीत, असे मुनगंटीवार म्हणाले.

### शिवसेना ठाकरे गट नाराज

**■ दरम्यान, कॉंग्रेस पक्षात सध्या गटबाजी सुरू आहे. चंद्रपूरमध्ये सर्वाधिक नगरसेवक हे कॉंग्रेस पक्षाचेच निवडून आल्याने महापौरपदासाठी कॉंग्रेस सज्ज दिसत आहे. परंतु, वडेट्टीवार-धानोरकर यांच्या गटापैकी कोणाला काय मिळणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही गटांनी थेट दिल्ली गाठली होती. तसेच सत्ता पक्षातील वाटेकऱ्यांना स्थायी समितीची जबाबदारी द्यावी, अशी वरिष्ठांमध्ये चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र, या वाटाघाटीत शिवसेना ठाकरे गटाला फारसे महत्त्व न दिल्याने ठाकरे गट नाराज असल्याची चर्चा आहे.**

### भाजपकडून शिवसेना ठाकरे गटाला ऑफर

**■ शिवसेना ठाकरे गटाची नाराजी समोर येताच भाजपने ठाकरे गटाला सत्तेचा प्रस्ताव दिल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेला सव्वा वर्षांचे महापौर पद तसेच 2 वर्ष स्थायी समिती देण्यास तयार असल्याचे सांगितले जात आहे. आता पहिला महापौर शिवसेना ठाकरे गटाचा की भाजपचा यावरून चर्चा अडली आहे. तसेच पहिला महापौर भाजपचाच करायचा, जर हे शिवसेनेला मान्य नसेल तर भाजप विरोधी पक्षात बसेल, अशी माहिती समोर आली आहे.**

# वन्य प्राणी उठले शेतकऱ्यांच्या जिवावर

## रात्रभर पिकाची रखवाली! पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान!

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**



बाळापूर : शेत शिवारातील वाढलेला वन्य प्राण्यांचा सुळसुळाट शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात त्रासदायक ठरत असुन शेती पिकांचे नुकसान वन्य प्राणी करीत असल्याने वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या जिवावर उठले असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत रब्बी हंगामातील पीक परिस्थिती जवळपास समाधान कारक असल्याचे चित्र दिसत असले तरी वन्य प्राणी पिकांचे नुकसान करीत असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडणार असल्याची वस्तुस्थिती निर्माण होत आहे.

सध्याच्या परिस्थितीत रब्बी हंगामातील हरभरा गहू ज्वारी तसेच कांदा पिकांचे रात्रीच्या सुमारास वन्य प्राणी निल गाईं हरीण रानडुक्कर पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात करीत असल्याचे चित्र उघडकीस येत आहे. शेतकऱ्यांच्या कष्टावर एका रात्रीत पाणी फिरल्याचे अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायक चित्र निर्माण होत आहे. राबराब राबून कडक उन्हात घाम गाळून शेतकरी पीक उभे करतो मात्र अशा प्रकारे एका रात्रीत संपूर्ण मेहनत उध्वस्त होत असल्यास शेतकऱ्यांनी करायचे तरी काय असा गंभीर प्रश्न ? शेतकऱ्यांना भेडसावत आहे तर रब्बी हंगामातील पीकांच्या उत्पादनावर खरीप हंगामातील पीकांचा खर्च तसेच संपूर्ण कुटुंबाची व्यवस्था अवलंबून असते अशा वेळी झालेले नुकसान केवळ आर्थिक नसून मानसिकदृष्ट्याही शेतकऱ्याला हादरवणारे आहे शासन निर्णयानुसार अशा घटनांची तात्काळ दखल घेऊन पंचनामे करण्यात यावेत आणि संबंधित शेतकऱ्यांना विलंब न करता तातडीची आर्थिक मदत देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे तत्काळ पंचनामा करून मदत द्यावी तसेच वन्य प्राणी यांचे पासून शेती पिकांचे संरक्षण करण्यासाठी ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात कुंपण अनुदान देखरेख व्यवस्था व प्रतिबंधात्मक उपाय यांची प्रभावी अंमलबजावणी झाली नाही तर अशा घटना वारंवार घडत राहतील आणि शेतकरी पूर्णपणे हतबल होईल एका रात्रीत उध्वस्त होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकांकडे संवेदनशीलतेने पाहीणे ही गरज असलेल्याच्या वन्य प्राण्यांकडुन होत असलेल्या नुकसानग्रस्त शेतकरी प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत.

**■ माझ्या शेतातील तसेच शेजारच्या शेतातील हरभरा पिकाचे वन्य प्राणी मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असल्याचे निदर्शनास येत आहे आजमितीला शेत शिवारात वन्यप्राण्यांचा मुक्त संचार मोठ्या प्रमाणात आहे शेती पिकांच्या रखवाली करीता रात्रभर स्वताच्या जिवाची पर्वा न करता रात्रभर शेतातच मुक्काम करावा लागत आहे.**
**-सुरेश मेहरे नुकसान ग्रस्त शेतकरी खिरपूरी.**

# साहित्य चोरीप्रकरणी चौघांना अटक

**▸विदर्भ केसरी। अमरावती,**

शहरातील हर्षराज कॉलनी परिसरातील पाण्याच्या टाकीच्या बांधकामाच्या ठिकाणावरून सात लाख ६५ हजारांची सामग्री चोरीस गेली होती. त्यात राजुरा बेड्यावरील चौघांना गाडगेनगर पोलिसांनी अटक केली आहे.

डिकेश शनी भोसले (वय २५), नज्जेश नज्या भोसले (वय २०), सुरेंद्र सुरेश पवार (वय २४), तुषार आरेश पवार (वय २०, सर्व रा. राजुरा बेडा, मार्डी रोड, अमरावती), अशी अटक चौघा संशयितांची नावे असल्याची माहिती गाडगेनगरचे पोलिस निरीक्षक अतुल वर यांनी दिली. तीन फेब्रुवारी २०२५ रोजी हर्षराज कॉलनीत एका कंपनीच्या वतीने सुरू असलेल्या पाणी टाकी बांधकामाच्या ठिकाणावरून सात लाख ६५ हजार रुपयांचे बांधकाम साहित्य चोरीस गेले होते. चार फेब्रुवारी रोजी हेमंत सुदाम वंजारी (वय ४२) यांनी नोंदविलेल्या तक्रारीवरून गाडगेनगर ठाण्यात अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गाडगेनगर पोलिसांनी चोरलेल्या मालापैकी काही ऐवज रमाबाई आंबेडकरनगर येथील भंगार विक्रेता विजय सूर्यभान किर्तक (वय ६१) याला विकला होता. तेथून एक लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिस निरीक्षक अतुल वर, विजया पंधरे, समाधान वाठोरे, सहायक पोलिस निरीक्षक मनोज मानकर, प्रकाश मेश्राम, भारत वानखडे यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

# १५ वर्षीय मुलगी बेपत्ता.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

येथील स्टेशन विभागातील सत्संग भवन परिसरातून नंदीनी दत्तात्रय राउत ही १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी अचानक बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार दिनांक ७फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास नंदीनी दत्तात्रय राउत (वय १५) ही कोणालाही काहीही न सांगता घरून निघून गेली. बराच वेळ होऊनही ती घरी न परतल्याने तिचे काका विजय सुभाष राउत (वय ४५) यांनी आजूबाजूचा परिसर, रेल्वे स्टेशन, बस स्थानक व नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला. मात्र, तिचा कोठेही पत्ता लागला नाही. अखेर याप्रकरणी त्यांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. बेपत्ता मुलीचे वर्णन.

नाव: नंदीनी दत्तात्रय राउत
वय: १५ वर्ष उंची: ५ फूट रंग: निमगोरा केस: लांब व काळे
नाक: सरळ, डोळे: साधारण काळे
पेहराव: अंगात पोपटी रंगाचा टॉप आणि काळ्या रंगाची जीन्स पँट, पायात शूज.


या तक्रारीवरून मुर्तिजापूर शहर पोलिसांनी अपराध क्रमांक १५३/२०२६, कलम १३७(२) BNS अन्वये अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार प्रभाकर नागे (ब.नं १५२४) या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

जर कोणास या मुलीबद्दल काहीही माहिती मिळाल्यास, त्यांनी तात्काळ मुर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन किंवा तपासी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसा निमित्ताने दर्यापूर येथे भरगच्च कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर -**





हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे वारसदार, धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या मार्गदर्शनात तयार झालेले करोडो बहिणीचे लाडके भाऊ, माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, शिवसेना पक्ष मुख्यनेते मा ना एकनाथजी शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे भव्य शंकरपट, भव्य रोग निदान शिबीर, रक्तदान शिबिर तसेच महिलांना आर्थिक सहाय्य या हेतूने शिलाई मशीन आणि गुणवंत गरजू विद्यार्थ्यांना व दिव्यांगांना सायकल वाटप अशा समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटक परमपूज्य श्रध्देय श्री जितेंद्रनाथजी महाराज पिठाधिश्वर श्रीनाथपीठ श्री देवनाथ मठ, अंजनगाव सुर्जी हे असणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष मा ना प्रतापराव जाधव आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री, भारत सरकार तर विशेष अतिथी म्हणून मा ना संजय राठोड मृद व जलसंधारण मंत्री, महाराष्ट्र राज्य, मा ना डॉ. पंकज भोयर गृह ग्रामिण गृह निर्माण, शालेय शिक्षण व सहकार खनीकर्म राज्यमंत्री,मा ना आशिष जयस्वाल कृषि कामगार अर्थ वित्त नियोजन विधी व न्याय तथा मदत पुर्नवसन राज्यमंत्री, महाराष्ट्र, आ संजय गायकवाड बुलढाणा मतदार संघ, आ राजेश वानखडे तिवसा मतदार संघ शिवसेना उपनेत्या प्रितीताई बंड,उपनेते ज्ञानेश्वर धाने पाटील व प्रमुख उपस्थिती म्हणून जगदीश गुप्ता प. विदर्भ संघटक शिवसेना, बाळासाहेब वानखडे प्रदेश उपाध्यक्ष, कि.आ. भाजपा महाराष्ट्र, रविंद्र गणोरकर विदर्भ प्रबोधन मंडळ कार्यकारणी अध्यक्ष सहसंपर्कप्रमुख श्याम भाऊ देशमुख शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील डिके, आशीष धर्माळे गोकुळदास श्रीराम राऊत अध्यक्ष दी जि.प. शिक्षक स. बँक अमरावती, समन्व्यक निशांत हरणे विठ्ठल सरप पाटील विभागीय सचिव युवासेना,प्रविण दिधाते लोकसभा अध्यक्ष युवासेना अम हे असणार आहे तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक गोपाल पाटील अरबट मा. जिल्हा प्रमुख अमरावती

# महत्त्वाचे

## शुभांगी चोथमल युजीसी नेट एन्ट्रान्स पीएचडी परीक्षेत उत्तीर्ण

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी :विठ्ठल भागवत**



मालेगाव :- तालुक्यातील मेडशी येथील संजय बबनराव चोथमल यांची कन्या युजीसी नेट एन्ट्रान्स पीएचडी साठी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पात्र ठरलेली असून यश संपादन केले आहे. मूळचे मालेगाव तालुक्यातील मेडशी गावचे रहिवासी आहे. देशातील अत्यंत कठीण समजली जाणारी आणि 'युजीसी' (UGC), नवी दिल्ली यांच्यामार्फत 7 जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेली सहाय्यक प्राध्यापक पद, जेआरएफ आणि पीएचडी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (NET) पहिल्याच प्रयत्नात पीएचडी प्रवेश मिळवलेला आहे. शुभांगी हिने तिचे उच्च शिक्षण (MA Marathi) आर. ए कॉलेज वाशिम येथे पूर्ण केले असून, पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे मालेगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



## रेखाताई साहेबराव खांडेकर यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**

येथील श्रीराम मंदिर येथे नुकताच एक हृदयस्पर्शी सोहळा संपन्न झाला. स्थानिक शाळेतील आदर्श शिक्षिका रेखाताई साहेबराव खांडेकर यांच्या प्रदीर्घ आणि निष्ठायुक्त सेवेनंतर त्यांचा 'सेवापूर्ती गौरव सोहळा' मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष हर्षल साबळे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी शिक्षक आमदार वसंतरावजी खोटरे सर उपस्थित होते. त्यांनी रेखाताईंच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित असलेल्या पाहूण्यांचाही शाल श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आले व उपस्थित मान्यवरांनी या कार्यक्रमाविषयी मनोगत व्यक्त केले व सत्कारमूर्ती रेखाताई खांडेकर यांचा गुणगौरव करण्यात आला , या कार्यक्रमात मूर्तिजापूर नगरपरिषद च्या सर्‌व पदाधिकारी व नगरसेवक यांचाही सत्कार करण्यात आले या प्रसंगी नगराध्यक्ष हर्षल साबळे, गजाननराव नाकट गट नेता नगरपरिषद रोहित अव्वलवार, उपनगराध्यक्ष प्राचार्य गजाननराव बोचरे विजयभाऊ देशमुख शिक्षण उपसंचालक विभाग, अमरावती अजाबरावजी वहिले सतिषभाऊ तायडे नायब तहसीलदार एकनाथराव तायडे व संदिपभाऊ तायडे मान्यवरांकडून सत्कार कार्यक्रमात सभापती सरिता पाटील, नगरसेविका , शुभदाताई सरनाईक, यांनीही उपस्थित राहून रेखाताईंच्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी रेखाताई खांडेकर व साहेबराव खांडेकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीराम मंदिर संस्था,बंटी गवई,अक्षय सदांशिव,ग्रीष्मा इंगळे,रोशन इंगळे, आशा निशाणराव, स्वप्नील निशाणराव,सोनू वानखेडे,अक्षय सिरसाट, संजय इंगळे, कैलास खांडेकर,मंजुळाबाई खांडेकर,सचिन धांडे, बोंडे,प्रा गजानन जोगळे, शैलेश गुप्ता, सिद्धार्थ चक्रे इत्यादींनी कार्यक्रमास सहकार्य केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा नारायण राऊत यांनी केले तर , कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा बाळासाहेब सरोदे व आभार साहेबराव खांडेकर यांनी मानले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने मान्यवर व निमंत्रीतगण उपस्थित होते,स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आज सर्वपक्षीय श्रध्दांजली

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सोमवारी (ता. नऊ) सायंकाळी पाच वाजता, संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह सर्वपक्षीय नेते, आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते, मंडळे व संस्थांचे पदाधिकारी देखील उपस्थित राहतील, अशी माहिती आमदार संजय खोडके यांनी दिली.

## आयटी पार्कसाठी जागा मंजूर

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

अमरावतीच्या नांदगावपेठ औद्योगिक वसाहतीमध्ये आयटी पार्क साकारण्यात येणार आहे. त्यासाठी १४१ एकर जागा देण्यात आली असल्याची माहिती एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. तथापि, या जागेवर पार्क उभा होण्यास लागणारा कालावधी बघता लहान उद्योजकांसाठी वडगाव माहुरे येथील शासकीय जमीन देण्याची मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले. अमरावतीला आयटी पार्क व्हावा, यासाठी मिशन आयटी पार्क ही चळवळ गेल्या चार वर्षांपासून राबवत असल्याचा उल्लेख करीत किरण पातूरकर यांनी या आंदोलनास बेलोरा विमानतळ उद्घाटन समारंभावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी घोषणा केल्याने यश आल्याचे अधोरेखित केले. ते म्हणाले, अमरावती विभागीय महसुलीचे केंद्र असून या विभागात दरवर्षी संगणक क्षेत्रात २५ हजारांवर विद्यार्थी उत्तीर्ण होतात. त्यांना रोजगारासाठी अन्य मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. याच शहरात आयटी पार्क व्हावा, अशी मागणी लावून धरली होती. आता या पार्कसाठी नांदगावपेठ औद्योगिक वसाहतीमधील १४१ एकर जागा मंजूर करण्यात आली आहे. नांदगाव येथील जागा शहरापासून दूर पडत असल्याने वडगाव माहुरे येथील २५ हेक्टर शासकीय जमिनीपैकी १० हेक्टर जागा देण्याची मागणी आम्ही केली आहे. मात्र ती अद्याप मंजूर झालेली नसली तरी त्यासाठी आग्रह कायम आहे. आयटी पार्कमुळे या भागातील हजारो विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणार असून त्यांचे स्थलांतर थांबणार आहे. पत्रकार परिषदेला रवींद्र खांडेकर, प्रशांत मोंढे, गजानन देशमुख, प्रा. दिनेश सातंगे व दीपक खताडे उपस्थित होते. मेडिकल कॉलेजची जागा आधीच मंजूर होती आलियाबाद येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी वर्ष २०२४ मध्येच जागा मंजूर करण्यात आलेली आहे, असा दावा करतानाच किरण पातूरकर यांनी ज्यांना श्रेय घ्यायचे त्यांनी ते घ्यावे, मात्र हे यश आमच्या नेतृत्वातील कृती समितीचे आहे, असा प्रतिदावाही केला. या जागेपूर्वी आम्ही दहा जागांचा प्रस्ताव दिला होता. त्याची पाहणी करण्यासाठी आलेल्या विजय शेगोकार समितीने आलियाबादची जागा योग्य ठरेल, असे सांगितले. या जागेच्या हस्तांतरणासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या एनओसी आम्हीच मिळवून दिल्याचाही दावा त्यांनी केला.

# जबाबदार पिढीसाठी ज्ञानपरंपरेचा अभ्यास आवश्यक

## डॉ. श्रीराम कावळे : संगळूदकर महाविद्यालयात राष्ट्रीय परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर -**



आपल्या भारताला देशाला गौरवशाली ज्ञानपरंपरेचा समृद्ध वारसा आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय परंपरा, मूल्ये, भाषा, संशोधन आणि कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. वेद, उपनिषद, योग, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान आणि समृद्ध जीवनमूल्ये असलेली भारतीय ज्ञान प्रणाली ही आपल्या शिक्षणाचा मजबूत पाया आहे. आजच्या जागतिक स्पर्धेच्या युगात केवळ माहिती नव्हे तर संस्कारयुक्त, संशोधनशील आणि जबाबदार नागरिक घडवण्यासाठी या ज्ञानपरंपरेचा अभ्यास अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे यांनी केले. ते श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालयात भारतीय ज्ञान प्रणाली या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये उद्घाटक व मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

या परिषदेच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य सी.डी. देशमुख, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ.अंबादास कुलट, बीजभाषक म्हणून प्रा.डॉ. रजनीश कौशिक, गुरुकुल कांगडी विद्यापीठ, हरिद्वार व प्रा. डॉ. मोनिका ठक्कर, लोककला अकादमी मुंबई तसेच शाळा व महाविद्यालय विकास समिती सदस्य अण्णासाहेब रेचे, शिवाजीराव देशमुख, शेषरावजी काळे, नरेशचंद्रजी लड्ढा, प्रदीपराव देशमुख, प्राचार्य डॉ.अतुल बोडखे, समन्वयक डॉ.विजय येलकर, डॉ.मनीष होले व डॉ.तुषार वानखेडे व्यासपीठावर उपस्थित होते.याप्रसंगी प्रमुख अतिथी सी.डी. देशमुख यांनी प्राचीन शिक्षण प्रणाली व आजची शिक्षण व्यवस्था यावर तुलनात्मक प्रकाश टाकून मनोगत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात ॲड.गजाननराव पुंडकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणात अंतर्भूत केलेल्या विषयांचा व भारतीय ज्ञान परंपरेचा संदर्भ जोडून विद्यार्थ्यांपर्यंत हे ज्ञान पोहोचवून पिढी घडवण्यासाठी प्रयत्नरत राहण्यासंबंधी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयातर्फे प्र-कुलगुरू डॉ.श्रीराम कावळे, सी.डी. देशमुख, प्रा.डॉ. रजनीश कौशिक, प्रा. डॉ.मोनिका ठक्कर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या परिषदेचे प्रस्ताविक डॉ. विजय येलकर यांनी तर स्वागतपर मनोगत प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी व्यक्त केले. या परिषदेचे सूत्रबद्ध संचालन इंग्रजी विभाग प्रमुख तथा सहसमन्वयक प्रा. डॉ.नरेंद्र माने यांनी केले तर आभार प्रा.डॉ.तुषार वानखेडे यांनी मानले. उद्घाटन सत्रानंतर बीजभाषक प्रा. डॉ. रजनीश कौशिक व प्रा.डॉ. मोनिका ठक्कर यांनी भारतीय ज्ञान परंपरेतील अनेक विषयावर प्रकाश टाकून पुढील दोन सत्रात सविस्तर उद्बोधन केले. या परिषदेमध्ये जवळपास ३७८ प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थ्यांनी नोंदणी करून २६० संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आले. सहभागी प्राध्यापक व संशोधकांचे संशोधन पेपरचे सादरीकरण सत्र व पोस्टर प्रदर्शन सुद्धा आयोजित करण्यात आले होते. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

चंद्रपूर

GOOD MORNING

## गडचिरोली शहरातील गरजू नागरिकांना सरसकट घरकुल योजनेचा लाभ द्या

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली शहरातील गरजू नागरिकांना सरसकट पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी जिल्ह्याचे सह पालकमंत्री आशिष जयस्वाल यांच्याकडे वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक बाळू टेंभुर्णे यांनी केली. सहपालकमंत्री आशिष जयस्वाल हे गडचिरोली नगर परिषदेचा आढावा घेण्यासाठी नगर परिषद कार्यालयात आले असता नगरसेवक बाळू टेंभुर्णे यांनी संवाद साधत निवेदनातून मागणी केली. यावेळी जयस्वाल यांना अवगत करतांना बाळू टेंभुर्णे म्हणाले की, गडचिरोली शहरातील बहुतांश वार्ड हे अतिक्रमीत जागेवर वसलेले असून सदर जागेच्या सातबा-यावर झुडपी जंगलाची नोंद आहे या सबबीखाली अतिक्रमण धारकांना जागेचे पट्टे मिळालेले नाहीत, शासनस्तरावर झुडपी जंगलाचा शेरा हटविण्याची कारवाई सुरू असली तरी याला खुप विलंब होत आहे, परिणामी गरजू नागरिकांना शासनाच्या अनेक सुविधा व योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हजारो नागरिकांनी घरकुलाचा लाभ घेण्यासाठी नगर परिषदेकडे अर्ज सादर केले आहेत परंतु मालकी हक्काच्या पट्टया अभावी योजनेचा लाभ मिळत नसल्याने २०११ च्या पूर्वीचे ज्यांचे घर आहे अशा सर्व गरजू नागरिकांना सरसकट घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा असेही टेंभुर्णे यांनी म्हटले आहे. यावेळी जयस्वाल यांनी जिल्हाधिका-यांशी चर्चा करा, लवकरच तोडगा काढू असे आश्वासन दिले.

## संक्षीप्त



### कुंभीटोला फाट्याजवळ अपघात, राजुल्ला खाँ पठाण जागीच ठार

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : कुरखेडा वरून बाजारातून आलू कांदे व भाजीपाला घेउन निघालेला राजूल्लाखाँ रहिमखाँ पठाण वय ६० वर्ष , याच्या दुचाकिला समोरून येणाऱ्या अनोळखी वाहनाने जबर धडक दिल्याने गंभीर जखमी होउन जागीच गतप्राण झाला. काल दि. ७फेबृवारी रोज शनिवारला सायंकाळी ७:००वा.कुभीटोला फाट्याजवळ हा अपघात झाला.गेवर्धा येथील ग्रामपंचायतच्या चाळीत छोटेसे जनता उपहारगृह चालवूनआपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होता. कुरखेडा येथे विवाह सोहळ्यात जेवण करून सामान घेउन तो परत विघाला होता. घटनेचा तपास पो हवा. ताराम करीत असून कुरखेडा पोलीस स्टेशन मध्ये अनोळखी वाहना विरूद्ध हिट अँड रण चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिकारी महेंद्र वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली शोध मोहिम सुरू आहे. आज दि. ८फेबृवारी रोज रविवारला राजूल्लाखां पठाण यांच्या पार्थीवावर गेवर्धा येथील मुस्लीम स्मशानभूमीत दुपारच्या नमाजनंतर २:००वा अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत मनमिळावू स्वभाव असलेल्या राजू भैय्या च्या जाण्याने अनेकांना धक्का बसला. त्यांच्या पश्चात ३भाऊ, दोन बहीणी, पत्नी,दोन मुली एक मुलगा असा शोकसंतप्त परीवार आहे.

### पुणे झेडपी निवडणुकीत बोगस मतदान

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत बोगस मतदान केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर रस्त्यावरील केसनंद भागातील एका मतदान केंद्रावर ही घटना घडली असून, त्यांच्याकडून बनावट आधारकार्ड जप्त करण्यात आले आहेत. या प्रकरणी मोहम्मद एहसान नजर (वय २०), अर्षद रोशन अली (वय २२), अखिलेश बिजूकुमार प्रसाद (वय २०), दिलीप सक्रु चव्हाण (वय ३६), प्रेमदास रामचंद्र राठोड (वय ३०) आणि अश्विनी प्रेमदास राठोड (वय २७) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# छुप्या मार्गाने वाळू तस्करी; प्रशासनाची धाडसी खेळी, ट्रॅक्टर जप्त

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : राजहंस शेंडे

नागपूर : नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून छुप्या मार्गाने वाहतूक करणाऱ्या तस्करांवर महसूल व पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करत मोठा दणका दिला आहे. नायब तहसीलदारांनी स्वतः पुढाकार घेत रचलेल्या या धाडसी कारवाईत वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडण्यात आला असून, संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. विश्वसनीय माहितीनुसार, बोरी–सदाचार परिसरातून नदीपात्रातील वाळू उपसा करून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती महसूल विभागाला मिळाली होती. माहिती मिळताच कोणतीही दिरंगाई न करता नायब तहसीलदार बुद्धभूषण निकाळजे यांनी संपूर्ण मार्गाची पाहणी करत तस्कर वापरत असलेल्या छुप्या मार्गाची निवड केली. मुख्य रस्त्यांऐवजी आडवाटेने वाहतूक होणार, याची अचूक खात्री झाल्यानंतर काही वेळ शांतपणे वाट पाहत ट्रॅक्टर नेमक्या ठिकाणी येताच झडप घालून कारवाई करण्यात आली. MH 40 A 3797 क्रमांकाचा ट्रॅक्टर वाळूसह ताब्यात घेण्यात आला. या कारवाईत ट्रॅक्टर चालक अरुण लूच्चे संतोष धावडे (रा. मांढळ) याला ताब्यात घेण्यात आले असून, सदर ट्रॅक्टर मांढळ येथील एका नागरिकाच्या मालकीचा असल्याची माहिती आहे. जप्त केलेला ट्रॅक्टर पुढील कार्यवाहीसाठी वेलतूर पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. या संयुक्त मोहिमेत मंडळ अधिकारी आशीष धनविजय, ग्राम महसूल अधिकारी मोहन पवार यांच्यासह महसूल व पोलिस विभागाच्या अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. महसूल विभागाच्या या तत्पर व धाडसी कारवाईमुळे परिसरातील अवैध



गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासनाचा वचक स्पष्टपणे दिसून आला आहे. अवैध वाळू तस्करीवर पुढील काळातही अशाच कडक कारवाया सुरू राहतील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# गद्रे ऑटोकॉनमध्ये ५.६४ लाखांचा गडबडघोट!

## वाशिम शाखेतील मॅनेजर सरदारसह सहा कर्मचाऱ्यांचा संगनमताने अपहार

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अकोला : शिवणी येथील महिंद्रा ॲण्ड महिंद्रा ऑटोमोबाईल डिलरशिप गद्रे ऑटोकॉन प्रा. लि. मध्ये कर्मचाऱ्यांनीच कंपनीच्या तिजोरीवर डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वाशिम शाखेतील मॅनेजर पंकज सरदार सह सहा कर्मचाऱ्यांनी संगनमत करून तब्बल ५ लाख ६४ हजार ८९९ रुपयांचा अपहार केल्याचा आरोप असून, या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल सुहास गद्रे यांच्या पत्नीने ३ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, वाशिम शाखेतील मॅनेजर पंकज रामकृष्ण सरदार (४६) याच्यासह अतुल अबचार, राहुल लांडगे, पियुष चौधरी, विजय कंकाळ व मिनाक्षी चौरपगार-हिवराळे यांनी ग्राहकांकडून जमा झालेली रोख रक्कम कंपनीच्या अधिकृत बँक खात्यात न भरता ती थेट स्वतःच्या अथवा खाजगी खात्यांत वळवली. १९ जानेवारी २०२६ रोजी शिवणी येथील मुख्य कार्यालयात वाशिम शाखेच्या डेली कॅश शीटची तपासणी करण्यात आली असता मोठी आर्थिक तफावत आढळून आली. त्यानंतर करण्यात आलेल्या अंतर्गत ऑडिटमध्ये ५ लाख २९ हजार ८९९ रुपयांचा अपहार झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाला आणखी गंभीर वळण देत, कंपनीकडून देण्यात आलेला सुमारे ३५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप व सिमकार्ड आरोपी पंकज सरदार याने अद्याप परत न केल्याचा आरोप आहे. लॅपटॉपमधील माहिती देण्यास तसेच सिमकार्ड परत करण्यास त्याने थेट नकार दिला असून, २० जानेवारीपासून कोणतीही पूर्वसूचना न देता तो गायब असल्याचे तक्रारीत नमूद आहे. संबंधित सिमकार्डचा गैरवापर झाल्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. कंपनीचा विश्वासघात करत आर्थिक फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होताच एमआयडीसी पोलिसांनी मंगळवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करून सर्व आरोपींना अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास उपनिरीक्षक दयाराम राठोड करीत आहे.

# पंचायत समिती पौनीची सर्वसाधारण आमसभा

## आमदार नरेंद्र भोंडेकर, खासदार प्रशांत पडोळे यांची प्रमुख उपस्थिती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी राजहंस शेंडे




पौनी : पंचायत समिती पौनी अंतर्गत वार्षिक सर्वसाधारण आमसभा पंचायत समितीच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या आमसभेच्या अध्यक्षस्थानी आमदार नरेंद्र भोंडेकर होते, तर खासदार प्रशांत पडोळे यांनी प्रमुख उपस्थिती लाभविली. या महत्त्वपूर्ण आमसभेला पंचायत समितीचे सभापती विठ्ठल नारनवरे, उपसभापती विनोद मेंढे, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांच्यासह गट विकास अधिकारी नितेश माने, तहसीलदार साळवे, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी तसेच तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. आमसभेत तालुक्यातील विकासकामे, ग्रामविकास योजना, मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व ग्रामीण भागातील प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून त्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, असे मार्गदर्शन आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी केले. खासदार प्रशांत पडोळे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांबाबत माहिती देत पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. ग्रामीण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्यातील समन्वय अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. आमसभेच्या माध्यमातून विविध विकासात्मक मुद्द्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले असून, येणाऱ्या काळात पौनी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



# पोलिस स्टेशन देचलीपेठा येथे भव्य जनजागरण मेळाव्याचे आयोजन व भव्य जनजागरण

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

अहेरी : मेळाव्याचे अध्यक्ष सत्यनारायण मिना CRPF G-09 BN द्वितीय कमांड अधिकारी अहेरी, उद्घाटक इलंगु सा. (AC) सिआरपीएफ 09- बटालियन देचलीपेठा, पोउपनि पवन बंडे सा. प्रभारी अधिकारी उप पोस्टे देचलीपेठा, पोउपनि दिनेश राऊत सा. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दिवाकर मडावी सरपंच ग्रा.पं. देचली, शामराव मडावी सरपंच, ग्रा. पं.कोंजेड, कैलास वेलादी गावपटेल मुखनपल्ली, विजू वेलादी असली, सागर वेलादी बिराडघाट, अर्जुन पोरतेठ मिट्टीगुडेम हे उपस्थित होते. उप पोस्टे देचलीपेठा हद्दितील मौजा-कोळसापल्ली, देचली ,पेठा, तोडका,कामासुर, मिट्टीगुडम, कोंजेड , बिन्हाडघाट, येथील नागरिक तसेच जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक वृंद व विद्यार्थी आले होते. प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत छत्रपती श्री शिवाजी महाराज, भगवान बिरसा मुंडा व वीर बाबुराव शेडमाके यांच्या प्रतिमेला दिप प्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून जनजागरण मेळाव्याची सुरुवात करण्यात आली. सदर जनजागरण मेळाव्याचे सूत्रसंचालन पोउपनि दिनेश राऊत सा.यांनी केले, उपस्थित नागरिकांना पोलीस दादालोरा खिडकी अंतर्गत येणाऱ्या विविध शासकीय योजना व प्रशिक्षणा बाबत मार्गदर्शन करुन त्यांचा जास्तीत जास्त फायदा सर्वांनी घेण्याचे आवाहन केले. सदर जनजागरण मेळाव्यामध्ये मागील एक महिण्यापासुन सुरु असलेल्या शिवन कला प्रशिक्षण मध्ये हद्दितील 17 बरोजगार महिलानां प्रशिक्षण देवुन शेवटी 17 शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. तसेच खालील उपयोगी साहित्य वाटप. शिलाई मशिन 17 नग, मोठे गंज 02 नग, मोठी कडई नग, खुर्ची 40 नग, संगणक 02 नग, मोठी वाढणी 04 नग इत्यादी उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. उप पोस्टे देचलीपेठा हद्दितील मौजा- देचली व पेठा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थांना संगणक 02 नग वाटप करण्यात आले. तसेच मा.प्रभारी अधिकारी उप पोस्टे देचलीपेठा पवन बंडे सा.यांनी सर्व मान्यवरांचे तसेच हददीतील सर्व महिला व नागरिकांचे व जिल्हा परिषद शाळेतील मुलांचे व शिक्षक वृंद यांचे आभार प्रकट करुन समारोप मार्गदर्शनमध्ये लोकांना बालविवाह मुक्त भारत जनजागृती अभियान विषयी तसेच अवैध धंदे,अंमलपदार्थ सेवन न करण्याचे, अवैध प्रवासी वाहतुक, सायबर गुन्हे विषयी माहिती देवुन बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे कोणीही बालविवाह करणार नाही व जो कोणी करेल त्याची माहिती तात्काळ पोलीस स्टेशन ला द्यावी असे मार्गदर्शन करुन विवध योजनांचा लाभ घेण्याचे तसेच व्यसनाधीनता, जादूटोणा, भुतप्रेत या अंधश्रद्धा पासून लांब राहण्याचे व अशा गोष्टींना विरोध करण्याचे आवाहन केले . सदर भव्य जनजागरण मेळावा मध्ये उप पोस्टे देचलीपेठा हद्दीतील एकूण 100 ते 110 च्या संख्येने माहिला, शाळेतील विद्यार्थी व आदीवासी बांधव उपस्थित होते. उपस्थित सर्वांना नाष्टा व चहा पाण्याची व्यवस्था करण्यात आली. सदर जनजागरण मेळावा यशस्वी रित्या व शांततेत पार पाडण्यासाठी उप पोलीस स्टेशन देचलीपेठा येथील जिल्हा पोलीस चे सर्व अधिकारी व अंमलदार, तसेच सीआरपीएफ चे अधिकारी अंमलदार यांच्या सहकार्याने जनजागरण मेळावा कोणताही अनुचीत प्रकार घडु न देता मोठ्या उत्साहाने शांततेत पार पडले.

### राजुल्ला खान पठाण यांचे निधन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गेवर्धा येथील जनता होटलचे संचालक राजुल्ला खान पठाण ह्यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो व त्यांच्या परिवारास हिम्मत मिळो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.



# मुरुमगाव येथील महसूल मंडळच्या शासकीय इमारतींचा उपयोग करण्याची मागणी

## जनसंवाद यात्रेत माजी आमदार डॉ. देवराव होळी यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आवाहन..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

धानोरा : तालुक्यातील मुरुमगाव येथे आयोजित जनसंवाद यात्रेदरम्यान माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी महसूल मंडळाच्या हद्दीतील बेवारस व वापराविना पडलेल्या शासकीय इमारतींच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. मुरुमगाव येथील महसूल मंडळाच्या अखत्यारीतील जीप व महसूल विभागाच्या बेवारस इमारतीमध्ये जिल्हा परिषद व महसूल विभागाची कार्यालये सुरु करण्यात यावीत, तसेच जिल्हा परिषद शिक्षक, आरोग्य विभागाचे कर्मचारी व इतर शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थान उपलब्ध करून देण्यात यावे, अशी ठोस मागणी त्यांनी केली. यावेळी बोलताना डॉ. होळी म्हणाले की, शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या अनेक शासकीय इमारती आज वापराविना पडून असून त्यांची दुरवस्था होत आहे. योग्य नियोजन व प्रशासनाच्या इच्छाशक्ती अभावी या इमारती हळूहळू भंगार अवस्थेत जात आहेत, ही बाब अत्यंत गंभीर आहे. या इमारतींचा योग्य वापर केल्यास कार्यालयीन अडचणी दूर होतील तसेच दुर्गम भागात काम करणाऱ्या शिक्षक, आरोग्य कर्मचारी व इतर शासकीय कर्मचाऱ्यांना राहण्याची सोय उपलब्ध होईल, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. होळी यांनी गडचिरोली जिल्हाधिकारी यांना थेट आवाहन करत सांगितले की, जिल्ह्यातील अशा सर्व बेवारस व न वापरल्या जाणाऱ्या शासकीय इमारतींचा आढावा घ्यावा व त्या त्या गावातील किंवा महसूल मंडळातील शासकीय कार्यालये, कर्मचारी निवास, आरोग्य केंद्रे किंवा इतर सार्वजनिक उपयोगासाठी वापरण्याबाबत तातडीच्या उपाययोजना कराव्यात. यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय थांबेल आणि ग्रामीण व आदिवासी भागातील प्रशासन अधिक सक्षम होईल. या मागणीला माजी जिल्हा परिषद सदस्य लता पुंगाटी, युवा मोर्चा अध्यक्ष राजेंद्र कोटवार, आदिवासी विकास परिषदेचे जिल्हा महासचिव उमेश उईके यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पाठिंबा दिला. त्यांनीही या इमारती वापरात आणल्यास स्थानिक पातळीवर सेवा सुविधा सुधारतील व नागरिकांना वेळेवर शासकीय सेवा मिळतील, असे मत व्यक्त केले.




# आदिवासी विद्यार्थ्यांनी क्रीडा व नृत्यावरच मर्यादित न राहता सर्वसमावेशक विकास साधण्याची गरज : गृहपाल सदाशिव नरताम यांचे प्रतिपादन

## आदिवासी विद्यार्थ्यांनी क्रीडा व नृत्यासोबतच सर्वांगीण विकास साधण्याची गरज

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : भयंकर वाढलेल्या स्पर्धेच्या युगात स्वतःचे अस्तित्व आणि अस्मिता निर्माण करायचे असेल व अन्य समाजासोबत स्वतःची प्रगती साधायची असेल तर आदिवासी विद्यार्थ्यांनी केवळ क्रीडा व नृत्य एवढ्या पुरते स्वतःला मर्यादित न ठेवता विविध क्षेत्रातील कौशल्य अंगीकारून सर्वसमावेशक विकास साधण्याची गरज आहे. असे मत गृहपाल सदाशिव नरताम यांनी व्यक्त केले. आदिवासी मुलांचे वसतिगृह तथा मुलींचे वसतिगृह कुरखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने ३ व ४ फेब्रुवारीला आयोजित आंतर विद्यालयीन - महाविद्यालयीन विविध स्पर्धा बक्षीस वितरण सोहळा व वार्षिक स्नेहसंमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी ते अध्यक्ष स्थानाहून बोलत होते. तालुक्यातील सर्व विद्यार्थी व वैचारिक रुची ठेवणाऱ्या महाविद्यालयेत्तर तरुणांकरिता बौद्धिक विचार मंच उपलब्ध करून देण्याचा पायंडा गेल्या 3 वर्षापासून या स्पर्धेच्या आयोजनातून घातला गेला आहे. या प्रसंगी कार्यक्रमाचे सहअध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक विवेक जिचकार, तालुका बाल विकास प्रकल्प अधिकारी राजश्री राहाटे, नेत्र चिकित्सा अधिकारी अनिल साळवे, दैनिक नवराष्ट्र शहर प्रतिनिधी कैलास उईके, नरहरी माकडे,मुलींच्या वसतिगृहाचे गृहपाल अश्विनी काटेखाये, पाटील, नैताम यांनी अतिथींच्या स्थानावरून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीक्षा पिंपळे व साहिल काटेंगे यांनी केले तर मुलांच्या वसतिगृहाचे गृहपाल तेजस मेश्राम यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नीलकंठ मोटघरे, नेहा गजभिये, सचिन मुंगनकर, देवेंद्र धोंडणे, करण शेंद्रे , वसंत कुडमेथे विद्यार्थी प्रमुख राकेश हलामी, विद्यार्थिनी प्रमुख शितल कोवाची इत्यादींनी सहकार्य केले. भाषण स्पर्धेत प्रथम विजेता श्रीराम विद्यालयाचा विद्यार्थी विष्णू गायकवाड, द्वितीय विजेती विधी बनसोड, तर आदिवासी मुलींच्या वसतिगृहाची विद्यार्थिनी दामिनी जमकातन ही तिसरी विजेती ठरली. गीत गायन स्पर्धेमध्ये श्रीराम विद्यालयाची विधी बनसोड प्रथम विजेती, द्वितीय विजेती मोनिका गहाणे तर मुलांच्या वसतिगृहातील नितीन गावड हा विद्यार्थी तृतीय विजेता ठरला.





दैनिक विदर्भ केसरी TODAY
विदर्भाचा मानबिंदू
गडचिरोली
GOOD MORNING

## मुलचेरा तालुक्यात विवाह सोहळ्यांना माजी खासदार डॉ. अशोकजी नेते यांची सदिच्छा भेट

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



मुलचेरा : मुलचेरा तालुक्यातील विविध ठिकाणी आयोजित विवाह सोहळ्यांना माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी सदिच्छा भेट देत नववधू-वरांना शुभाशीर्वाद दिले. दि. ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी भाजप जिल्हा सचिव सुभाषजी गणपती तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते बादलजी शहा यांच्या मुलांच्या विवाह सोहळ्यानिमित्त आयोजित स्वागत समारंभास डॉ. अशोकजी नेते उपस्थित राहिले. यावेळी त्यांनी नवदाम्पत्यांना सुखी, समृद्ध आणि यशस्वी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी भाजप माजी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाशजी दत्ता, मुलचेरा तालुकाध्यक्ष संजयजी सरकार, उतम शर्मा, तारक बिशवास यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नोटीस न देताच राजकीय षडयंत्रातून पाडली इमारत

## पत्रकार परिषदेत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार यांचा आरोप

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

अहेरी : गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी नगरपंचायत क्षेत्रात सध्या प्रशासकीय 'दबंगगिरी' आणि राजकीय सूडबुद्धीची कामे जोरात सुरू आहे असे म्हणत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी माझी गडअहेरी मार्गावरील चार मजली इमारत नगरपंचायतीने कोणत्याही पूर्वसूचना किंवा कायदेशीर नोटीसशिवाय पोलीस बळाचा वापर करून पाडल्याचा आरोप पत्रकार परिषदेत केला आहे.सध्या ६ फेब्रुवारी २०२६ ला नागपूर खंडपीठाने चार आठवड्याची स्थगित दिल्याची माहिती अजय कंकडालवार यांनी अहेरी येथील पत्रकार परिषदेत दिली आहे.



अजय कंकडालवार यांनी पत्रकार परिषद घेऊन प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, ज्या इमारतीवर नगरपंचायतीने बुलडोजर चालवला, त्या जागेची सर्व कायदेशीर कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. यामध्ये प्रॉपर्टी कार्ड, मोजणीचा नकाशा आणि क-शीट यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या जागेबाबतचे प्रकरण अद्याप न्यायप्रविष्ट असताना आणि नगररचना विभागाकडे अपील केलेली असतानाही प्रशासनाने ही घाईघाईने माझ्या इमारतीवर कारवाई केली.प्रशासकीय अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करीत अजय कंकडालवार यांनी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी गणेश शहाणे आणि त्यांचे सहकारी वैभव पांढरे यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. "या अधिकाऱ्यांनी राजकीय दबावाखाली येऊन किंवा मला राजकीयदृष्ट्या संपवण्यासाठी हे षडयंत्र रचले आहे. माझी सर्व कागदपत्रे वैध असतानाही मला कोणतीही नोटीस न देता पोलीस बंदोबस्तात माझे घर पाडण्यात आले. ही सरळ सरळ प्रशासकीय दबंगगिरी आहे," असे अजय कंकडालवार यांनी नमूद केले.आंदोलनाचा इशारा देत या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी अजय कंकडालवार यांनी जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ शासनाकडे धाव घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. "जर मला न्याय मिळाला नाही, तर येत्या काळात न्यायालय, उपोषण आणि जनआंदोलनाचा मार्ग पत्करू," असा इशाराही त्यांनी दिला आहे.या प्रकरणावर आता नगरपंचायत प्रशासन किंवा वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

> सर्व कारवाई अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालयाने अहेरी येथील अजय कंकडालवार यांचा बांधकाम पाडण्याला स्टेटस quo अर्ज व अपील फेटाळल्यामुळे व कोणताही स्टे नसल्यामुळे कारवाई करण्यात आलेली आहे.
> — **गणेश शहाणे,** मुख्याधिकारी, न. पं अहेरी.

नगर भूमापन क्रमांक ५१/२ चा अकृषक आदेश मधील अट क्रमांक एक नुसार सदर जागेवर बांधकाम करण्यापूर्वी स्थानिक नियोजन प्राधिकरणाच्या मापदंडानुसार बांधकाम करण्याबाबत उपविभागीय अधिकारी यांनी निर्देश दिलेले आहेत. जर तसे बांधकाम न झाल्यास सदर बांधकाम पाडण्यात येईल असे सुद्धा निर्देश देण्यात आलेले आहेत. अट क्रमांक पाच नुसार सदर नगर भूमापन क्रमांकमध्ये कोणत्याही व्यक्तीचे अनधिकृत ताबा आढळून आल्यास जमीन पूर्ववत करण्याची कार्यवाही करण्यात येईल अशी अट आहे.

## संक्षीप्त








### गडचिरोली जिल्हा सामान्य रुग्णालयात अस्वच्छतेचे सावट..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये रुग्णालय परिसरातील नाल्यांना डबक्याचे स्वरूप प्राप्त झालेले असून, सदर नाल्यांमध्ये पाणी साचून त्यावर सेवाड निर्माण झाल्यामुळे नाल्यांना हिरव्या रंगाचे स्वरूप प्राप्त झाले असल्याचे समोर आले आहे. सदर बाब लक्षात घेतली असता जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा शल्य चिकित्सकांचे सामान्य रुग्णालयाकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील स्थानिक जिल्हा सामान्य रुग्णालयामध्येच स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले जात आहे,तर संपूर्ण जिल्हाभरातील ग्रामीण रुग्णालयांचे नियोजन करण्यात जिल्हा शल्य चिकित्सक सक्षम असतील का? व रुग्णालयातील वार्डांमध्ये तरी स्वच्छता ठेवली जाते की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांचा दौरा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम हे गडचिरोली जिल्ह्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सखोल आढावा घेण्यासाठी दिनांक ०९ व १० फेब्रुवारी २०२६ रोजी दोन दिवस गडचिरोली दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचायती तसेच जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी करण्यात आलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच अनुसूचित जाती-जमातींसाठी मंजूर निधी, त्या निधीचा उपयोग, लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेल्या योजना व प्रत्यक्ष कामांची तपासणी करण्यात येणार आहे. दौऱ्याच्या पहिल्या दिवशी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी गडचिरोली शासकीय विश्रामगृह येथे आगमन. त्यानंतर सकाळी ११ वाजता गडचिरोली नगरपरिषद, आरमोरी व देसाईगंज नगरपरिषद यांचा तसेच दुपारी १२.३० वाजता अहेरी, धानोरा, कुरखेडा, मुलचेरा, सिरोंचा नगरपंचायत क्षेत्रातील योजनांचा आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये लाड पागे योजना, दलित वस्ती सुधार योजना, घरकुल योजना, अनुकंपा प्रकरणे, तसेच सफाई कर्मचारी टेंडर व इतर बाबींची तपासणी करण्यात येणार आहे. दुपारी २ वाजता सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्यासमवेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व खर्चाचा आढावा. रात्री गडचिरोली येथे मुक्काम. दिनांक १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद गडचिरोली, दुपारी १ वा. जिल्हा क्रीडा विभाग, २.३० वाजता आदिवासी विकास विभाग, दुपारी ३ वाजता महिला व बाल विकास विभाग आणि सायं ४ वाजता समाजकल्याण विभाग, यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात येणार आहे. यावेळी संबंधित विभागांकडून मागील पाच वर्षांचा खर्च, प्रगती अहवाल व योजनांची अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.



### सिरोंचा तालुक्यात जप्राबाद (गोलकार मोहल्ला) येथे वीजप्रश्न गंभीर; नवीन डीपी बसवण्याची मागणी, AIYF चा आंदोलनाचा इशारा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

सिरोंचा : सिरोंचा तालुक्यातील जप्राबाद (गोलकार मोहल्ला) येथे शासनाच्या विशेष योजनेतून प्रस्तावित असलेला विद्युत ट्रान्सफॉर्मर (डीपी) मागील दोन ते तीन वर्षांपासून कार्यान्वित नसल्याने संपूर्ण गाव अंधारात आहे. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यामुळे नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी तसेच ऑल इंडिया युथ फेडरेशनच्या वतीने यापूर्वीही संबंधित महावितरण प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते, मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना ऑल इंडिया युथ फेडरेशनचे तालुका अध्यक्ष रवि बारसागंडी यांनी स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली. ते म्हणाले, "शासनाच्या योजनेअंतर्गत जप्राबाद (गोलकार मोहल्ला) येथे तात्काळ नवीन विद्युत ट्रान्सफॉर्मर बसवण्यात यावा. वारंवार निवेदन देऊनही जर महावितरण प्रशासन दुर्लक्ष करत असेल, तर ८ दिवसांत डीपी न बसवल्यास ऑल इंडिया युथ फेडरेशनच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल." दरम्यान, वीजअभावी रात्रीच्या वेळी जंगली श्वापदांची भीती वाढली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही परिणाम होत आहे. त्यामुळे दोषींवर कारवाई करून तातडीने नवीन डीपी बसवण्याची मागणी ग्रामस्थ, नागरिक व AIYF च्या वतीने करण्यात आली आहे. महावितरण प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास येत्या काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



## चिल्ड वॉटर व्यवसायाच्या नावाखाली दारू माफियाचा उद्योग

### स्थानिक गुन्हे शाखेने केला भांडाफोड..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

चंद्रपूर : व्याहाड (बु.) पोलीस स्टेशन सावली अंतर्गत येणाऱ्या व्याहाड (बु.) येथे चिल्ड वॉटर व्यवसायाच्या नावाखाली अवैधरित्या देशी व विदेशी दारूची विक्री व वाहतूक करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत १५ लाख ९४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरात अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

७ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मुखबिरामार्फत माहिती मिळाली की, व्याहाड बुद्रुक येथील रहिवासी महेश गड्डमवार हा परिणीती ट्रान्सपोर्ट एक्वा चिल्ड वॉटर नावाच्या ऑफिस व गोडाऊनमधून लाल रंगाच्या हुंडाई क्रेटा कारने देशी व विदेशी दारूची वाहतूक करणार आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित कार तसेच ऑफिस व गोडाऊनची झडती घेतली.

या झडतीत पोलिसांना ३,८०० नग देशी दारू (९० मि.ली.), ३८४ नग रॉयल स्टॅग विदेशी दारू (१८० मि.ली., मध्यप्रदेश), ९६ नग रॉयल स्टॅग विदेशी दारू (१८० मि.ली., महाराष्ट्र), १४४ नग हावर्ड्स ५००० कंपनीचे ५०० मि.ली. कॅन, दुकानाच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली २ लाख ९५ हजार ४१० रुपयांची रोख रक्कम, सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर तसेच लाल रंगाची हुंडाई क्रेटा कार क्रं एम एच ४० एआर २३६५ असा एकूण १५ लाख ९४ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सावली येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून, कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा तसेच कलम ३३६ (२) भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये पुढील कारवाई सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, पोलीस उपनिरीक्षक सर्वेश बेलसरे, पोलीस हवालदार चेतन गज्जलवार, पोलीस अंमलदार गणेश भोयर, सुमित बरडे, दिनेश अराडे, प्रफुल्ल गारघाटे सह स्थानिक गुन्हे शाखेच्या मुल पथकांनी केले.

## गोसीखुर्द धरणातून विसर्ग वाढणार ; वैनगंगा नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



गडचिरोली : गोसीखुर्द धरणातून वैनगंगा नदीपात्रात सध्या सुरु असलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे चिचडोह बॅरेजच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. गोसीखुर्द धरणामधून सध्या 160 क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत असून, परिस्थिती लक्षात घेता उद्या शनिवार 08 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 11.00 वाजता एक उभे उचल द्वार उघडून 405 क्यूमेक्स पाण्याचा विसर्ग वैनगंगा नदीत सोडण्यात येणार आहे. या वाढीव विसर्गामुळे वैनगंगा नदीच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता असून, नदीकाठच्या सखल भागांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

त्यामुळे वैनगंगा नदीपात्रात मासेमारी, जनावरे चरण्यास नेणे, नदी ओलांडणे किंवा कोणतेही आवागमन करणाऱ्या नागरिकांनी अत्यंत काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः चिचडोह बॅरेज परिसर, नदीकाठची गावे व शेतकरी बांधवांनी परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी तात्काळ संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे. ही माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, गडचिरोली यांच्याकडून देण्यात आली असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## एटापल्ली तालुक्यात दोन वेगवेगळ्या रस्ता अपघातांत एकाचा मृत्यू, तर दुसरा जखमी...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

एटापल्ली : तालुक्यात शनिवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी दोन वेगवेगळ्या रस्ता अपघातांमध्ये एकाच्या जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून, पहिली घटना एटापल्ली - आलापल्ली मार्गावर एटापल्ली ते करेम फाट्याच्या पुढे, नाग मंदिराजवळ घडली. शनिवारी सायंकाळी ७ वाजता एमएच ३४-सीजे ७४०३ क्रमांकाची कार आणि दुचाकी यांची जोरदार धडक झाली. या अपघातात दुचाकीस्वार बबलू गोटा (रा. तुमरगुंडा) यांचा जागीच मृत्यू झाला.

दुसरी घटना एटापल्ली-हेडरी मार्गावर घडली, जिथे येलचिल मदत केंद्राच्या हद्दीत दुचाकी आणि कारचा अपघात झाला. याशिवाय, आलदंडी ठाण्याच्या हद्दीत दुचाकी आणि केमिकल टँकरच्या धडकेची घटना घडली. या अपघातात नरेंद्र वासेकर (३५, रा. जीवनगट्टा) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर गडचिरोली येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बबलू गोटा यांच्या मृत्यूमुळे तुमरगुंडा गावात शोक व्यक्त केला जात आहे.




## आदर्शच्या विज्ञानाच्या विद्यार्थ्यांची आद्रभूमी क्षेत्रभेट

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**




देसाईगंज : ६ फेब्रुवारी या जागतिक आद्रभूमी दिनानिमित्त नैनपूर तलाव, वडसा येथे वडसा वनपरिक्षेत्र व अर्थ कन्झर्वेशन ऑर्गनायझेशन (ECO) यांच्या संयुक्त विद्यमाने आद्रभूमी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्रभेटीत आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज येथील विज्ञान विद्याशाखेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आद्रभूमीचे महत्त्व, जैवविविधता तसेच पर्यावरणीय संतुलन राखण्यात आद्रभूमीची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी आद्रभूमी परिसंस्थेतील स्थलांतरित पक्षी, जलचर वनस्पती, कीटक व इतर सजीवांचे निरीक्षण केले. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आद्रभूमीतील पक्ष्यांचे जीवनचक्र, अन्नसाखळी तसेच पर्यावरणीय महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच ECO संस्थेचे प्रतिनिधी, वन्यजीव शास्त्रज्ञ ललित उरकुडे, अर्थ कंझर्वेशन ऑर्गनाइझेशनचे अध्यक्ष मा. मनोज वठे, मोहसिनभाई जव्हेरी महाविद्यालय, देसाईगंज येथील प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील चौधरी यांनी आद्रभूमी संवर्धन, त्यावरील धोके व संरक्षण उपाययोजना याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. डॉ. श्रीराम गहाने, प्राचार्य, आदर्श कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज व महाविद्यालयातील प्राणिशास्त्राचे प्राध्यापक ज्ञानेश मोहुर्ले व दिपिका शर्मा यांनी सुद्धा आद्रभूमीला भेट दिली व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ही आद्रभूमी क्षेत्रभेट उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दृष्ट्या अत्यंत माहितीपूर्ण ठरला. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग संवर्धन व वन्यजीव संरक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित झाला. भविष्यातील पिढीसाठी आद्रभूमी जतन व संवर्धन करण्याचे आवाहन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## 'गण गण गणात बोते'च्या गजरात चुरचुरा येथे यात्रा महोत्सवात भक्तीचा जागर ; माजी खासदार डॉ. अशोक नेते यांनी घेतले दर्शन व महाप्रसादाचा लाभ

### पोर्ला येथे गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त दर्शन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : संत शिरोमणी गजानन महाराज प्रकट दिनाचे औचित्य साधून मौजा-चुरचुरा (माल), ता. जि. गडचिरोली येथील माँ पुजामोती देवस्थान परिसरात भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या पावन सोहळ्यानिमित्त संपूर्ण परिसर 'गण गण गणात बोते' च्या जय घोषाने दुमदुमून गेला असून, भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे अनोखे वातावरण पाहायला मिळाले. या धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमास माजी खासदार तथा भाजप अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी सदिच्छा भेट देत माँ पुजामोती व संत गजानन महाराजांच्या चरणी भक्तीभावे दर्शन घेतले. त्यांनी भजन-पूजनात सहभागी होत भक्तीमय वातावरणाचा मनसोक्त आनंद घेतला. दरवर्षीप्रमाणे यंदाही चुरचुरा येथील माँ पुजामोती देवस्थानात पहाटेपासूनच विविध धार्मिक विधी, अभिषेक व भजन पूजेचे आयोजन करण्यात आले होते. परिसरात हजारो भाविकांची मांदियाळी उसळली होती. भजनाच्या तालावर तल्लीन झालेले भक्त, जयघोषांचा निनाद आणि सर्वत्र पसरलेला भक्तिभाव यामुळे यात्रेला एक वेगळीच आध्यात्मिक उंची प्राप्त झाली होती. यात्रेदरम्यान मा. खा. डॉ. अशोकजी नेते यांनी उपस्थित साधत उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. विशेष म्हणजे त्यांनी स्वतः भजनात सहभाग नोंदवून श्रद्धेचा आदर्श घालून दिला. त्यानंतर त्यांनी भाविकांसोबत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला तसेच स्वतः महाप्रसादाचे वितरणही केले. "अशा धार्मिक व सांस्कृतिक उत्सवांमुळे समाजात एकोपा, बंधुता आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. चुरचुरा व पोर्ला येथील भाविकांची नितांत श्रद्धा आणि उत्साह पाहून मन प्रसन्न झाले," असे उद्गार डॉ. अशोकजी नेते यांनी यावेळी काढले.

#### पोर्ला येथेही दर्शन

याच दिवशी संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त पोर्ला येथेही मा.खा. डॉ. अशोकजी नेते यांनी दर्शन घेऊन भक्तीभावाने नतमस्तक होत परिसरातील भाविकांशी संवाद साधला.
या प्रसंगी सामाजिक नेत्या डॉ. दिप्ती अभिजित कोरडे, पोलीस पाटील शंशाक कुलसंगे, सामाजिक नेते भास्कर कुलसंगे, अभिजित कोरडे, देविदास भोयर, दशमुखे जी, उकडजी राऊत, देवस्थान समितीचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.
या यात्रा महोत्सवाने चुरचुरा परिसरात भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचे चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण केले.








## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




### खा... आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता... की १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

**न...**
जि...
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


**...मरावती**
...ल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

**अकोला**
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

**यवतमाळ**
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

**बुलढाणा**
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

**चंद्रपूर**
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



**आकर्षक वेतन**

संगणक चालक पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**